जीवन मार्ग

संस्थापक : आर. बी. मोरे

संपादक
डॉ. अशोक ढवळे

संपादक मंडळ
कुमार शिराळकर
डॉ. विठ्ठल मोरे
अजित अभ्यंकर
सुभाष थोरात
डॉ. रमेशचंद्र पाटकर
राजीव देशपांडे
शोभा ठेकेदत्त
डॉ. उदय नारकर

मुद्रक/प्रकाशक
डॉ. अशोक ढवळे

अक्षरजुळणी
आत्माराम पडवळ

मुखपृष्ठ व मांडणी
केतन शिंदे

व्यवस्थापक
चंद्रकांत शिंदे

प्रसिद्धी स्थळ
'जनशक्ती', पी. बी. मार्ग
वरळी, मुंबई - ४०० ०१३
फोन : ०२२-२४९५१५७६
फॅक्स : ०२२-२४९६१५२५
ई मेल : mahacpim@gmail.com

संपादकीय

# दहशतीचे राजकारण

तृणमूल काँग्रेसचे लोकसभेतील खासदार तापस पालने अलिकडेच केलेल्या अत्यंत अपमानास्पद विधानांमुळे साहजिकच संपूर्ण देशभर तीव्र संतापाची लाट उसळली. त्याच्या लांच्छनास्पद वक्तव्याची थेट निर्भत्सना करण्यात आली. राजकीय लाभ लाटण्यासाठी सुलभ हत्यारे म्हणून दहशत, हिंसाचार आणि बलात्कार यासारख्या कारस्थानांचे समर्थन करणाऱ्या व त्यांना मान्यता देणाऱ्या या तिरस्करणीय विधानांना लोकशाही, नागरी समाजाने अजिबात थारा देता कामा नये.

अशा प्रकारची विधाने करणाऱ्यांच्या गुन्ह्याची नोंद व्हायलाच हवी. त्यांच्या या विधानांना खरेतर पश्चिम बंगालमधील त्यांच्या सध्याच्या सत्ताधारी तृणमूल काँग्रेस पक्षाचा ध्वन्यर्थाने पाठिंबा आहे आणि तरीही या विधानांशी आपल्याला काहीही देणे घेणे नाही, त्याच्याशी आपला काडीमात्र संबंध नाही असे छदमीपणे म्हणणाऱ्या तृणमूल काँग्रेसला आपल्या जबाबदारीतून अंग काढून घेता येणार नाही याची खबरदारी घ्यायला हवी. निवडून आलेल्या या खासदारावर कडक कारवाई तर व्हायला हवीच शिवाय त्याचबरोबर जनतेने आपण होऊन व शांततापूर्वकरित्या त्याच्यावर सामाजिक बहिष्कार घालायला हवा, त्याला वाळीत टाकायला हवे. असे केल्याने निदान आपली शासन व्यवस्था स्वच्छ करण्याच्या प्रक्रियेस तरी सुरुवात होईल. परंतु अशा प्रकारची कोणतीही कारवाई करण्याचे तृणमूल काँग्रेस व त्याच्या पक्ष नेत्या ममता बॅनर्जी यांच्या विचाराधीन असल्याचे दिसत नसल्यामुळे दहशतीच्या राजकारणाला तृणमूल काँग्रेसचे संपूर्ण पाठबळ असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध होत आहे.

१४ जून रोजी एका सार्वजनिक संमेलनात या खासदाराने केलेले भाषण इलेक्ट्रॉनिक मिडियाद्वारे सर्वत्र प्रसृत झाले आणि त्याची दूरवर निंदा देखील करण्यात आली. पश्चिम बंगालच्या राज्य पोलिसांनी मात्र 'भारतीय दंड संहितेंतर्गत' (इंडियन पीनल कोड) तापस पालच्या विरोधात कोणतीही कारवाई केलेली नाही. अर्थात ममता बॅनर्जींच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसचा या संपूर्ण प्रकरणाला मूक पाठिंबा असल्यामुळे पोलिसांकडून अशीच निष्क्रियता अपेक्षित होती म्हणा!

'गुन्हेगारी स्वरूपाची दहशत' या गुन्ह्याच्या सर्व छटा तापस पालच्या इलेक्ट्रॉनिक मिडीयावरील भाषणामध्ये आढळतात आणि म्हणून 'इंडियन पीनल कोड'च्या ५०३ या कलमाद्वारे पोलिसांना तापस पालवर थेट खटला भरता येतो. एवढेच नव्हे तर या कायद्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ज्यांच्यावर सोपविलेली असते त्या राज्य पोलिसांना 'इंडियन पोलीस ॲक्ट - १८६१' या कायद्यातील कलम क्र. २३ द्वारे हेतूपुरस्सरपणे अशा प्रकारची भाषणे करण्यास एखाद्या व्यक्तीस अटकाव करण्यासाठी, 'अग्रक्रमाधिकार' म्हणजे दुसऱ्याच्या आधी कारवाई करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. कोणीही तक्रार केलेली नसली तरीही तापस पालच्या बाबतीत, त्याने असे निंदनीय भाषण आधीच केले असल्यामुळे त्याची पुनरावृत्ती त्याने करू नये म्हणून हे महाशय विशेष करून अटक करण्यालायक आहेत असे म्हणावे लागते. 'जो कुणी दुसऱ्या व्यक्तीला मारण्याची, दुखापत करण्याची धमकी देतो, प्रतिष्ठा, नावलौकिक धुळीस मिळवीन असे धमकावितो, मालमत्ता उध्वस्त करण्याची ताकीद देतो, तो 'गुन्हेगारी स्वरूपाच्या दहशतीचा' गुन्हा करतो असे 'इंडियन पीनल कोड'च्या ५०३ या कलमामध्ये नमूद केले आहे व असा गुन्हेगार अटक करण्याजोगा आहे असे मानले जाते. असे असूनही राज्य पोलिसांनी तापस पालच्या विरोधात कोणतीही दंडात्मक कारवाई केली नाही, याचा अर्थ पोलिसांना राज्य सरकारचा आश्रय आहे हे स्पष्ट होत आहे.

राज्य पोलिसांनी आपले कर्तव्य पार पाडण्यात केलेल्या हलगर्जीपणाची कल्पना यायला हवी असेल तर 'खासदार' तापस पाल आपल्या भाषणात काय म्हणाले ते ऐका. मिडीया व वृत्तपत्रातील बातम्यांनुसार ते म्हणाले होते, ''या ठिकाणी कुणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा कार्यकर्ता असेल तर मी काय म्हणतोय हे लक्ष देऊन ऐका. 'चौमाहा' खेड्यातील तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांच्या किंवा त्यांच्या कुटुंबियांच्या जवळपास जरी फिरलात तरी तुम्हाला त्याची किंमत मोजावी लागेल. गाठ माझ्याशी आहे. माझ्याकडे तुमची हुशारी चालणार नाही. मी तुमच्यापेक्षा चालाख आहे'' त्यानंतर त्यांनी अशीही धमकावणी दिली की, ''राजकीय विरोधकांना मी गोळी घालून ठार करू शकतो,

एवढेच नव्हे तर त्यांच्या महिलांवर बलात्कार करण्यासाठी मी माझ्या तरुणांना मोकाट सोडेन हे लक्षात ठेवा.'' आपल्याकडे नेहमी बंदूक असते अशी गर्वोक्तीही त्याने केली.

भारतीय संसदेच्या एका निर्वाचित सदस्याने केलेले हे विधान अतिशय घृणास्पद आहे. या संबंधी कोर्टाने जनहित-खटला 'पब्लिक इन्टरेस्ट लिटीगेशन' - (PIL) दाखल केल्याचे मिडीयाच्या माहितीनुसार कळते. तापस पालच्या विरोधात कठोरात कठोर कारवाईची मागणी करण्यासाठी उसळलेल्या जन-आक्रोशाचे शमन करण्याऐवजी तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा व पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री निर्लज्जपणे प्रत्युत्तर देताना मिडीयाला म्हणाल्या, ''मी काय करायला हवे? मी त्याच्यावर गोळी झाडायला हवी का?'' हे विधानही तितकेच गर्हणीय नाही का?

आज वस्तुस्थिती अशी आहे की, पश्चिम बंगालमध्ये 'राजकीय दबावाचे एक सुलभ हत्यार' म्हणून बलात्काराचा बेमुर्वतपणे वापर केला जात आहे. एवढेच नव्हे तर 'बलात्काराची राजधानी' म्हणून आज कोलकाता शहर ओळखले जात आहे, हे बेशरमपणे मान्य करण्याची पाळी आपल्यावर आली आहे. या पार्श्वभूमीवर 'राष्ट्रीय महिला आयोगाने' या प्रकरणाची स्वत:हून (SUO MOTO) दखल घेऊन, तापस पालच्या विरोधात कायदेशीर कारवाई सुरू करायला हवी. तसेच देशाच्या सर्व नागरिकांना 'जगण्याचा व वैयक्तिक स्वातंत्र्याचा' मूलभूत अधिकार प्रदान करणाऱ्या घटनात्मक कलम क्र. २१चे उल्लंघन तापस पालने आपल्या भाषणाद्वारे केल्यामुळे मानवाधिकार आयोगाने देखील त्याच्या विरोधात कारवाई करायला हवी.

तसे पाहिले तर तापस पाल जे म्हणाला, त्यात पश्चिम बंगालमध्ये आज दिसून येणाऱ्या वास्तवाचे प्रतिबिंब पडलेले दिसून येते. निवडणुकांमध्ये मतदारांचा पाठिंबा मिळविण्यासाठी व राज्यात आपली सत्ता अधिकाधिक मजबूत करण्यासाठी तृणमूल काँग्रेसने हिंसक अत्याचाराची व दहशतीची लांबलचक मालिका सातत्याने चालू ठेवली आहे. त्याची पुढील बोलकी उदाहरणे पहा.

★ २०११च्या विधानसभा निवडणुकांनंतर, राज्यामध्ये १३ मे २०११ ते जून २०१४ पर्यंत माकप व डाव्या आघाडीच्या १५७ कार्यकर्त्यांची व नेत्यांची हत्या करण्यात आली.

★ ५ मार्च २०१४ रोजी निवडणुका जाहीर झाल्यानंतर माकप व डाव्या आघाडीचे नेते व सहानुभूतीदार अशा एकूण १२ जणांना ठार मारण्यात आले; ८,७८५जण गंभीरपणे जखमी झाले.

★ राज्याच्या एकूण १७ जिल्ह्यांमध्ये गरीब शेतकऱ्यांच्या व शेतमजुरांच्या शेतीच्या कामात मोठ्या प्रमाणात बाधा आणण्यात आली. २७,२८३ शेतकरी व शेतमजुरांची त्यांच्या जमिनीवरून हकालपट्टी करण्यात आली. परिणामी ९,८११.८३ एकर जमिनीची मशागत होऊ शकली नाही. सर्व जिल्ह्यांमध्ये कित्येक कोटी किंमतीच्या गुराढोरांचा नाश झाला.

★ ४८,३८२ कुटुंबांना त्यांच्या रहात्या घरांतून हाकलून लावण्यात आले. ६,१५२ घरे पूर्णपणे जमीनदोस्त करण्यात आली.

★ धमकी देऊन पैसे उकळण्यात आलेल्या व सुटकेकरता पैसे दिलेल्या पीडितांची एकूण संख्या ९,५२९ इतकी होती. एकत्रितपणे त्यांना २७ कोटी, ८७ लाख, ८ हजार इतकी चक्रावून सोडणारी रक्कम भरावी लागली होती.

★ माकपची १,३६५ कार्यालये अक्षरश: लुटली गेली. त्याचबरोबर डाव्या पक्षांच्या जनसंघटनांच्या ३९८ कार्यालयांची मोडतोड करण्यात आली.

★ गुन्हेगारांच्या विरोधात कारवाई करण्याऐवजी राज्य सरकारच्या पोलिसांनी माकप व डाव्या चळवळीच्या कार्यकर्त्यांवर खोट्या केसेस लादून त्यांना ताब्यात घेतले.

★ हिंसाचार व दहशतीच्या राजकारणाचा सर्वात मोठा तडाखा महिलांना बसला : २९१ महिलांवर बलात्कार करण्यात आला, ६७५ महिलांचा विनयभंग झाला व १,०३५ जणांवर शारिरीक हल्ले करण्यात आले.

हा व इतरतपशील अलिकडेच 'पश्चिम बंगाल-डावी आघाडी कमिटी'च्या प्रतिनिधीमंडळाने मुख्यमंत्र्याकडे सादर केला आहे. अजूनपर्यंत तरी सरकारमार्फत कोणतीही कारवाई झाल्याची चिन्हे नाहीत.

भारतीय संसदेचे अर्थसंकल्पीय बजेट-सत्र एवढ्यात भरेलच. तापस पालसारखे जे संसद सदस्य अत्यंत अवमानास्पद व बेकायदेशीर विधाने करतात त्यांना आपल्या देशाचे कायदे करणाऱ्यांच्या बरोबरीने संसदेत बसण्यास परवानगी द्यावी का? या महत्त्वाच्या प्रश्नावर संसदसत्राला निर्णय घ्यावा लागणार आहे. राजकारण्यांच्या आश्रयाच्या बळावर जे संसद सदस्य कायद्याचे बिनधास्तपणे उल्लंघन करण्याची शिरजोरी करतात, त्यांना 'देशाचे कायदेकानून करणारे' अशी मान्यता देणे म्हणजे लोकशाहीचे विडंबन करणे होय.

आज पश्चिम बंगालमधील दहशती राजकारणाच्या पार्श्वभूमीवर आपल्या देशाला व देशाच्या जनतेला एका कळीच्या प्रश्नावर निर्णय घ्यायचा आहे. भारतीय लोकशाहीला व भारताच्या प्रजासत्ताक संविधानाला सुरुंग लावणारे, दहशतीचे राजकारण आपण आपल्या देशात बेमुर्वतपणे चालू ठेवण्यास मोकळीक देणार आहोत का? की या देशघातकी विचारसरणीला कडाडून विरोध करून ती मोडून पाडणार आहोत? कोणत्याही परिस्थितीत दहशतीला वाव मिळता कामा नये हे कायम लक्षात ठेवायला हवे. यापूर्वी १९७०च्या दशकात पश्चिम बंगालच्या जनतेने अभेद्य अशी एकजूट बांधून, विस्तृत जनसंघर्ष उभे करून निमफॅसिस्ट दहशतवादी शक्तींचा पराभव केला होता. प. बंगालच्या जनतेसाठी तो काळ मोठ्या कसोटीचा काळ होता. कित्येक वर्षे जनतेला अतोनात क्लेश सहन करावे लागले होते, उदात्त त्याग करावे लागले होते व त्यातूनच जनता या निमफॅसिझमचा यशस्वीरित्या पाडाव करू शकली. दरम्यान एक नवी पिढी जन्माला आली व मोठी झाली. आज या नव्या पिढीला, लोकशाहीच्या रक्षणासाठी, प्रत्येक नागरिकाच्या जीवितासाठी, स्वातंत्र्यासाठी आणि सन्मानासाठी पश्चिम बंगालची ही उज्ज्वल परंपरा, हा साहसपूर्ण वारसा पुढे चालू ठेवण्याची गरज आहे.

*(अग्रलेख, पीपल्स डेमॉक्रसी)*

(अनुवाद : शोभा ठेकेदत)

# तृणमूल खासदाराच्या घृणास्पद धमकीच्या विरोधात संपूर्ण पश्चिम बंगालमध्ये संतप्त निदर्शनांचा उद्रेक!

मार्क्सवादी कम्युनस्टि पक्षाच्या कार्यकर्त्यांना ठार मारा आणि त्यांच्या कुटुंबातील महिलांवर बलात्कार करा अशा प्रकारची जाहीरपणे धमकी देणारा तृणमूल काँग्रेसचा खासदार तापस पाल याच्या विरोधात पश्चिम बंगालमध्ये संपूर्ण राज्यभर संतप्त निदर्शनांची लाटच उसळली. त्याचे भयावह वक्तृत्व टेलिव्हिजनवरून प्रसारित होताच राज्यातील सर्व स्तरातील जनतेने अतिशय तीव्रपणे त्या वक्तव्याचा निषेध नोंदवला. तापस पालची ही वक्तव्ये म्हणजे पश्चिम बंगालमध्ये मानवी हक्क आणि लोकशाही कशा प्रकारे पायदळी तुडविली जात आहे याचे उदाहरणच असल्याचे डाव्या आघाडीने म्हटले आहे.

१४ जूनला नाडिया जिल्ह्यातील कृष्णनगर या आपल्या लोकसभा मतदारसंघातील तेहत्ता येथील चौमथा या गावात कार्यकर्त्यांच्या सभेत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या स्थानिक कार्यकर्त्यांना व पाठिराख्यांना धमकावत पाल म्हणाला, जर सीपीएमच्या कार्यकर्त्यांनी माझ्या तृणमूलच्या कार्यकर्त्यांना हात लावला तर मी माझ्या मुलांना त्यांच्या घरात घुसवेन आणि त्यांच्या बायकांवर बलात्कार करायला सांगेन. आणि ह्या सीपीएमच्या पाठीराख्यांसाठी बलात्कार ही काही एकच शिक्षा असणार नाही, तर मी त्यांची घरे आणि संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त करेन. मी कसा रिव्हॉल्व्हर बाळगणारा गुंड आहे हे ह्या दोन वेळा खासदार बनलेल्या महाशयाने मोठ्या गर्वाने सांगितले व म्हटले, सीपीएमच्या पाठिराख्यांना या माझ्या रिव्हॉल्व्हरने मी स्वत: गोळ्या घालेन.

ह्या भाषणाबद्दल त्या भागातील गावकऱ्यांना अगोदरच माहिती होती पण एका बंगाली चॅनेलने ते व्हिडिओ टेलिव्हिजनवरून प्रसारित केल्याने ते देशभर सर्वांना कळाले व त्याच्या विरोधात संपूर्ण देशात व राज्यभर संतप्त प्रतिक्रिया उमटली. हे भाषण केवळ एखाद्या व्यक्तीच्या विकृत मनोवृत्तीचे दर्शन घडवत नसून राज्यातील सत्ताधारी पक्षाने राजकीय दहशतवाद कसा माजविला आहे ह्याचे दर्शन घडवत आहे.

याकडे केवळ गुंडगिरीचा एक सुटा प्रसंग म्हणून बघता येणार नाही, तर २७ जून रोजी नाडिया जिल्ह्यातील तेहत्ता ग्रामपंचायतीत निवडून आलेल्या सीपीएमच्या अब्दुल हक शेख याचा सीपीएमची ग्रामपंचायतीतील ताकद कमी करून ती ग्रामपंचायत ताब्यात घेण्यासाठी खून करण्यात आला. त्याच पंचायतीच्या रणजित मलिक नावाच्या दुसऱ्या एका निवडून आलेल्या सभासदाचाही पंचायत निवडणुकीनंतर खून करण्यात आला. नाडिया जिल्ह्यातील मोठ्या भागात दहशतीचे थैमान चालू आहे.

डाव्या आघाडीचे अध्यक्ष बिमान बसू यांनी राज्यातील सर्व स्तरावरील जनतेला संसद सदस्याच्या या चिथावणीचा तीव्र निषेध करण्याचे आवाहन केले. राज्यातील सत्ताधारी पक्ष लोकशाहीचा गळा घोटून राज्यात जंगलराज स्थापित करायला निघाला आहे असा आरोप बिमान बसू यांनी केला. ह्यांच्या सर्वोच्च नेत्याची वागणूकही अशीच असल्याने ह्या तृणमूलच्या खासदाराकडून वेगळ्या वागणुकीची अपेक्षा काय करणार ? अशी टीका करीत त्या खासदाराच्या या वागणुकीला तृणमूलची नैसर्गिक वागणूक, असे राज्याचे विरोधी पक्षनेते सुर्यकांत मिश्रा यांनी संबोधले. कोणीही तक्रार दाखल करण्याची वाट न बघता पोलिसांनी याची परस्पर दखल घ्यावी व खासदाराला अटक करावी अशी मागणी त्यांनी केली.

कोलकात्याच्या बाऊबाजार या भागात अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेने रास्ता रोको केले. संपूर्ण राज्यात जनवादी महिला संघटनेने व आयसीडीसीच्या अंगणवाडी कामगारांनी निषेध मोर्चे काढले. ज्या नाडिया जिल्ह्यात ही दहशतीची भाषा वापरली गेली तेथे अनेक वस्त्यांत शेकडो लोक निषेध मोर्चात सामील झाले. एसएफआय आणि डीवायएफआयच्या कार्यकर्त्यांनी सलग दोन दिवस राज्यातील सर्व भागात मोर्चे काढले. नाडिया जिल्ह्यातील नाक्शीपारा येथे मोठा निषेध मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेते सामील झाले होते. कोलकाता, सिलीगुडी, बर्धमान, पुरुलिया आणि राज्यात इतरही अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांनी आणि तरुणांनी खासदाराचे पुतळे जाळले. राज्यातील अनेक वरिष्ठ बुद्धिवंतांनी खासदाराच्या या भाषणाचा तीव्र निषेध केला. जनवादी महिला संघटना आणि इतर जनसंघटनांनी निदर्शने चालूच ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

देशभर व राज्यात इतकी कडवी प्रतिक्रिया उमटल्यानंतर तापस पाल याने पक्षाला माफीचे पत्र लिहिले. निवडणूक प्रचाराच्या तापलेल्या वातावरणात आणि उडालेल्या धुरळ्यात असे वक्तव्य झाल्याचे त्याने नमूद केले आहे. हा तर साफ खोटेपणा आहे कारण त्याचे भाषण निवडणुकीनंतर महिन्याभराने झालेले आहे. सुरुवातीला तृणमूल काँग्रेसने त्याचे हे माफीचे पत्र स्विकारले. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांची प्रतिक्रिया मात्र अत्यंत मासलेवाईक आहे, त्यांनी पालच्या वक्तव्यांबाबत असहमती दाखवली पण मी काय करू शकते ? मी काही त्याला ठार मारू शकत नाही असे उद्गार काढले. पण २४ तासात त्यांचा सूर बदलला. तृणमूल खासदारांच्या सभेत त्या माध्यमांवर घसरल्या व स्थानिक लोकांकडून विकत घेऊन असे व्हिडीओ दाखवल्याबद्दल त्यांनी माध्यमांवर टीकेची झोड उठविली. कॅमेऱ्यासमोर पक्षाच्या नेत्यांनी असे बोलू नये असा उपदेश त्यांनी खासदारांना केला. स्वत: मुख्यमंत्र्याचीच भूमिका माफीची असल्यावर राज्याचे पोलीस स्वत:हून कोणतीही कारवाई करणे शक्यच नव्हते.

तृणमूलच्या बीरभूम जिल्ह्याचा अध्यक्ष अनुब्रता मोंडल यानेही तृणमूल बंडखोरांची घरे जाळण्याची धमकी दिली होती आणि पोलिसांवर बॉम्बही फेकले होते. त्यानंतर तृणमूल बंडखोरांच्या घरांवर प्रत्यक्ष हल्ले चढविण्यात आले त्यात एका तृणमूलच्या बंडखोराचे वडील मारले गेले. पोलिसांनी बराच काळ काहीही कारवाई केली नाही आणि ममता बॅनर्जींनी मोंडलला संरक्षण दिले. शेवटी कोलकाता उच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर चौकशी सुरू झाली. दुसरी घटना आहे त्याच जिल्ह्यातील. तेथील तृणमूलचा आमदार मनीरुल हक याने सीपीएमच्या लवपूर येथील तीन कार्यकर्त्यांना ठार मारल्याची बढाई सर्वादेखत जाहीरपणे मारली. पण या आमदाराविरोधात पोलिसांनी कोणतीही कारवाई केली नाही. या घटनेबाबतही कोलकाता उच्च न्यायालयात केस चालू आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या संरक्षणा आडून तृणमूलच्या या माफिया नेत्यांचे हे उद्योग चालू आहेत. या खासदाराने ज्या गोपीनाथपूर या ठिकाणी ही वक्तव्ये केली तेथील गावकरी हल्ला होण्याच्या भीतीने अक्षरश: रात्री जागून काढत आहेत. पुरुषांना घराबाहेर पडण्याचे धाडस होत नसून महिला आपल्या मुलाबाळांना शाळेत पाठवायला घाबरत आहेत. पण या दहशतीविरुद्ध सीपीएमच्या नेतृत्वाखाली लढा अविरत सुरूच राहणार आहे.

□□□

# पक्षाची आणि डाव्या शक्तींची नव्याने उभारणी : पावले तातडीने उचलली गेली पाहिजेत!

**प्रकाश करात**

लोकसभा निवडणुकीत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला आणि डाव्यांना दारुण पराभवाला सामोरे जावे लागले आहे. पक्षाने लढवलेल्या ९३ जागांपैकी फक्त ९ जागा मिळाल्या असून ३.२५ टक्के मते मिळाली आहेत. या व्यतिरिक्त पक्षाने व डाव्या लोकशाही आघाडीने पाठिंबा दिलेले दोन अपक्ष केरळमध्ये विजयी झाले आहेत. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या एका जागेसह डाव्यांनी एकूण फक्त १२ जागा जिंकल्या आहेत.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या या अतिशय खालावलेल्या कामगिरीची गंभीर चिकित्सा होणे गरजेचे आहे. या टीकात्मक चिकित्सेमुळे योग्य निष्कर्षाप्रत पोहोचणे शक्य होईल व त्या आधारे पक्षाच्या राजकीय भूमिकेचे आणि संघटनेचे कठोर परीक्षण करण्याचे काम हाती घ्यावे लागेल.

७ आणि ८ जूनला झालेल्या पक्षाच्या केंद्रीय कमिटीच्या सभेत पक्षाच्या कामगिरीचा व्यापक आढावा घेण्यात आला. पक्षाच्या स्वतंत्र शक्तीत आणि जनसमर्थनात प्रचंड घट झालेली आहे. आणि ही घट केवळ पश्चिम बंगालमध्ये पक्षाला बसलेल्या तडाख्यामुळे झालेली नसून संपूर्ण देशातच पक्षाच्या वाढीबाबत जे अपयश आलेले आहे त्याचा हा परिणाम आहे. देशभरात पक्षाची वाढ न होणे व पक्ष राजकीयदृष्ट्या प्रभावहीन होणे या अपयशाची संपूर्ण जबाबदारी पॉलिटब्यूरो आणि केंद्रीय नेतृत्वाचीच आहे.

केंद्रात भाजपच्या नेतृत्वाखालील सरकार असो अगर काँग्रेसच्या, ते अंमलात आणत असलेल्या नवउदारवादी धोरणांना मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि डावे पक्ष सातत्याने विरोध करीत आलेले आहेत. कामगार वर्गाच्या हक्कांवर जो हल्ला या धोरणांमुळे होत होता त्या हक्कांच्या संरक्षणाच्या संघर्षात ते सातत्याने गुंतलेले होते. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि डाव्यांनी आर्थिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात पर्यायी धोरणांचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी अखंडपणे प्रयत्न केले. धर्मनिरपेक्षतेच्या बचावासाठी त्यांनी धर्मांध राजकारणाचा कसून विरोध केला. सामाजिकदृष्ट्या शोषितांच्या हक्काच्या लढ्यातही ते अग्रभागी होते. या सगळ्या पार्श्वभूमीवरही पक्ष आणि डावे जनतेचा विशेषत: तरुणांचा पाठिंबा मिळविण्यात अपयशी ठरल्याचे निवडणूक निकालांनी दाखवून दिले आहे. त्यामुळेच त्रुटींवर मात करून पक्षाचे जनतेपासूनचे तुटलेपण संपविण्यासाठी तातडीने पावले उचलण्याची गरज असल्याचा निष्कर्ष केंद्रीय कमिटीने आपल्या निवडणुकीच्या आढावा अहवालात काढलेला आहे.

सद्य परिस्थितीवर मात करण्यासाठी आणि पक्ष, डावे आणि लोकशाहीवादी शक्तींच्या वाढीचा पाया निर्माण करण्यासाठी केंद्रीय कमिटीने चार प्रमुख उपाय योजण्याचे निर्णय घेतले आहेत.

१) प्रत्येक पक्ष काँग्रेसमध्ये स्विकारण्यात आलेल्या राजकीय-डावपेचात्मक धोरणामध्ये पक्षाची ताकद स्वतंत्रपणे वाढविण्यावर भर देण्यात आलेला आहे पण आपण ते करण्यात अपयशी ठरलेलो आहोत. पश्चिम बंगाल, केरळ आणि त्रिपुरा ही तीन ताकदवान राज्ये सोडली तर बाकी कुठेच या बाबतीत प्रगती झालेली नाही. जोपर्यंत पक्षाची ताकद स्वतंत्रपणे वाढत नाही तोपर्यंत ताकदवान डावी आणि लोकशाहीवादी आघाडी स्थापन करून डाव्या आणि लोकशाहीवादी पर्यायाला सामोरे आणण्याचे डावपेचात्मक उद्दिष्ट यशस्वी होणे अशक्य आहे.

जे राजकीय-डावपेचात्मक धोरण आज आपण घेत आहोत त्याचे पुनर्परिक्षण करणे हे प्रमुख पाऊल आपल्याला सर्वप्रथम उचलले पाहिजे. आपण अवलंबित असलेल्या संयुक्त आघाडीच्या डावपेचांसकट पक्षाच्या राजकीय धोरणाचे सर्व कंगोरे चिकित्सकपणे तपासण्याची गरज आहे. या प्रक्रियेनुसार आपण नेमका आणि योग्य राजकीय मंच निर्माण करण्यामागे काय त्रुटी आहेत हे शोधून काढू शकू.

सामान्यत: पक्षाने अमलात आणलेल्या राजकीय-डावपेचात्मक धोरणाचा आढावा पक्ष काँग्रेसच्या वेळेस घेतला जातो. पण आजच्या घडीला तेवढेच पुरेसे नाही. आपल्याला अतिशय सखोल चिकित्सा करण्याची गरज आहे. त्यानंतरच आपण योग्य निष्कर्षांप्रत पोहोचू शकू. त्यामुळेच पुढच्या वर्षी एप्रिलमध्ये होणाऱ्या पक्ष काँग्रेसच्या आधी हे पुर्नपरीक्षण करून निष्कर्षापर्यंत पोहोचण्याचा निर्णय केंद्रीय कमिटीने घेतलेला आहे. हा आढावा अहवाल ज्यात सध्याच्या राजकीय-डावपेचात्मक धोरणाच्या परीक्षणाचे निष्कर्षही समाविष्ट असणार आहेत तो अहवाल पक्ष काँग्रेसमध्ये ठेवण्यात येणाऱ्या नव्या राजकीय-डावपेचात्मक धोरणाच्या ठरावाच्या मसुद्यासह चर्चेसाठी संपूर्ण पक्षासमोर ठेवला जाईल. या पध्दतीने पक्ष काँग्रेसमध्ये स्विकारल्या जाणाऱ्या नवीन राजकीय-डावपेचात्मक धोरणावर पक्षांतर्गत सखोलपणे चर्चा होईल.

२) देशात गेल्या पंचवीस वर्षात साम्राज्यवादी जागतिकीकरणाच्या प्रभावाखाली उदारीकरणाचा झालेला प्रवेश आणि नवउदारवादी धोरणांची होत असलेली अंमलबजावणी यामुळे आपल्या देशाच्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीत मोठे बदल झालेले आहेत. ह्या बदलांमुळे वर्गांचे स्वरूपच बदलून गेले आहे आणि वर्गांतही बरेच फरक आणि बदलही झालेले आहेत. हे बदल कामगारवर्गात, शेतमजुरात, शेतकऱ्यांत आणि मध्यम वर्गात घडलेले आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून ह्या बदलांचा परिणाम राजकीय आणि संघटनात्मक कारभारावर कसा होत आहे याचा आपण अनुभव घेत आहोत. त्याचप्रमाणे बड्या भांडवलदारांच्या आणि इतर क्षेत्रातील भांडवलदारांच्या स्वरूपात आणि तुलनात्मक सामर्थ्यातही बदल झालेले आहेत.

त्यामुळे कार्यक्रमाची निश्चिती करताना आणि नवउदारवादी सत्तेमुळे जे विभाग सर्वात जास्त पीडित आहेत त्यांच्या प्रश्नांना हात घालताना हे सर्व बदल विचारात घेतले जातील. सत्ताधारी वर्गाविरोधात तीव्र आंदोलन उभारण्याच्या पार्श्वभूमीवर विविध विभाग आणि वर्गांसंबंधीच्या कार्यक्रमात आणि दृष्टीकोनात बदल करण्याची गरज आहे.

यासाठी समाजात जे बदल घडलेले आहेत त्या बदलांचा आणि विविध वर्गांच्या आणि सामाजिक स्तरांच्या नेमक्या भूमिका आणि स्थिती यांच्या

ठोस अभ्यासाची गरज आहे. या विविध विभागांच्या ठोस चिकित्सक अभ्यासांच्या आधारावर पक्षाचे धोरणात्मक उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून आपण कार्यक्रम आणि मागण्या निश्चित करू शकतो.

असा ठोस अभ्यास हाती घेऊन तो विशिष्ट मुदतीत पूर्ण करुन त्याचा उपयोग पक्षाचे नेमके राजकीय-डावपेचात्मक धोरण निश्चित करण्यासाठी करण्याचा निर्णय केंद्रीय कमिटीने घेतलेला आहे.

३) या राजकीय कामाबरोबरच पक्षाची संघटना, संघटनेची कार्यपध्दती आणि जनतेतील कामाची दिशा याकडे पण लक्ष पुरविण्याची गरज आहे. जनसंघर्ष आणि चळवळींचे रूपांतर पक्षाच्या राजकीय हितसंबंधात करण्यात पक्ष संघटनेची रचना असमर्थ ठरत आहे हा एक मुद्दा आहेच. पण संघर्षाला चालना मिळून चळवळीचा विकास करण्यातही संघटनात्मक कमकुवतपणामुळे अपयश येत आहे ही सुध्दा एक समस्या आहे. पठडीबध्द कार्यपध्दती आणि जनतेबरोबर जैव संबंध राखण्यातील असमर्थता हे प्रश्नही आहेतच. यात बदल घडला पाहिजे आणि मोहीम उभारताना अगर लोकांशी संवाद साधताना नवीन तंत्रज्ञानाचा वापर केलाच पाहिजे. पक्ष संघटनेची मुळापासून सुधारणा आणि चुकीच्या प्रवृत्तींची दुरुस्ती करण्याचे काम हाती घ्यावयास हवे.

४) जनसंघटनांची वाढ, त्यांची स्वतंत्र कार्यप्रणाली आणि त्यांचे व्यापक जनसंघटन हे पक्षाच्या भविष्यातील वाढीसाठी अत्यंत आवश्यक आहे. जनसंघटनांतील सभासदांच्या बऱ्याचशा विभागांनी पक्षाच्या अथवा डाव्या उमेदवारांना मतदान केलेले नाही असे राज्य कमिट्यांनी घेतलेल्या निवडणूक आढाव्यातून दिसून आलेले आहे. वर्गीय संघटना आणि जनसंघटनांची स्वतंत्र कार्यपध्दती आणि राजकीय काम यावर पक्षसभासदांनी विशेष लक्ष ठेवले पाहिजे. यात निश्चितच काही उणिवा आहेत. हा मुद्दा अतिशय गंभीरपणे विचारात घेतला गेला पाहिजे.

वरील चारही मुद्दे एकमेकांशी संबंधितच आहेत आणि ते एकत्रच विचारात घेणे गरजेचे आहे. पक्ष आज ज्या परिस्थितीला तोंड देत आहे त्या परिस्थितीची खोली जाणून घेऊन या चार उपायांच्या अंमलबजावणीचा प्रयत्न एकत्रितपणे करण्याचे आवाहन केंद्रीय कमिटीने पक्षाला केले आहे.

निवडणुकीनंतर भाजपच्या नेतृत्वाखालील नरेंद्र मोदींच्या सरकारची स्थापना ही एक नवीन राजकीय परिस्थिती आहे. या परिस्थितीत नवउदारवादी धोरणांचा मारा अधिकच जोमाने होणार यात काहीच शंका नाही. आंतरराष्ट्रीय वित्तीय भांडवलाच्या आणि बड्या भांडवलदारांच्या मागण्यांबाबत पावले उचलली जाऊ लागलेलीच आहेत. उलट जनतेच्या जीवनमानावर टाच आणणारे उपाय योजण्याचे घाटत आहे. इंधन दरवाढीची आणि महागाईची धोरणे चालूच ठेवण्यात आलेली आहेत.

हिंदुत्वाचा आपला कार्यक्रम पुढे रेटण्याचे प्रयत्न भाजप आणि आरएसएसने चालू केलेले आहेत. शासनाच्या विविध संस्थांत आरएसएसचा शिरकाव सहज सुलभ झालेला आहे. हिंदू अतिरेकी प्रवृत्तींनी अल्पसंख्यांकांवर आणि धर्मनिरपेक्ष मूल्यांवर हल्ले चढविणे चालू केले आहे. पुणे येथील घटना आणि गुजरात, उत्तर प्रदेश, कर्नाटक आणि हरियाणा येथील धर्मांध चकमकी ही धोक्याची निशाणीच आहे.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि डावे या उजव्या आक्रमकतेचा प्रतिकार करण्यासाठी पावले उचलतील आणि श्रमिकांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी विविध संघर्ष संघटित करतील व चालना देतील. डाव्या शक्ती धर्मांध तत्वज्ञानाच्या विरोधात आणि राजकारणाविरोधात नेहमीच लढा देत आल्या आहेत. आताही सर्व धर्मनिरपेक्ष आणि लोकशाहीवादी शक्तींना या बहुसंख्याकांच्या विनाशी धोक्याच्या विरोधात संघटित करून संघर्ष करण्याच्या कामी कळीची भूमिका डावेच निभावतील.

डाव्या शक्तींना पुन्हा सामर्थ्यशाली करण्याची नितांत गरज आहे. सर्व डाव्या शक्तींना एकत्र करण्यासाठी मार्क्सवादी कमयुनिस्ट पक्ष अथक परिश्रम करेल. सर्व डाव्या शक्ती, गट आणि बुद्धिवादी यांना एकत्र आणण्यासाठी चर्चा चालू आहेत. एकत्रित आणि पुन्हा ताकदवान बनलेल्या डाव्या शक्तीच भारतीय राजकारणाला मिळालेल्या या उजव्या वळणाने जी आव्हाने उभी केलेली आहेत त्यांना परतवून लावू शकतील.

**(अनुवाद: राजीव देशपांडे)**

---

## (पाणी का गढूळ झाले?... पान १० वरून)

सिंचन प्रकल्पांना अपूर्णतेचा शाप आहे. अपूर्णतेमुळे अपंगत्व आले आहे. कोट्यवधी रुपये खर्च करून आणि विस्थापित व पर्यावरणाचा बळी देऊन अट्टाहासाने बांधलेले प्रकल्प जन्मत:च आजारी आहेत. त्याची लक्षणे प्रकल्पाप्रकल्पांत पहायला मिळतात. धरण आहे तर कालवे नाहीत. कालवे आहेत तर धरण नाही. दोन्ही असेल तर पाणी नाही. पाणी असेल तर ते शेपटापर्यंत जात नाही. ७५-८० टक्के पाणी मध्येच वाया जाते. पाणी चोरीचे प्रमाण भयावह आहे. जलाशयावरील व कालव्याच्या वरच्या भागातील धनदांडगे अमाप पाणी वापरत आहेत. दुष्काळी भागात वारेमाप ऊस आहे. खरीप व रब्बी पिकांऐवजी उन्हाळी व बारमाही पिके घेतली जात आहेत. सिंचनाखालचे क्षेत्र म्हणून आक्रसले आहे. लाभक्षेत्रात असूनही टेलचे शेतकरी कोरडवाहूच राहिले आहेत. त्यांना पाणी मिळत नाही. शेतीचे पाणी शहरांकडे व उद्योगांकडे वळवले जाते आहे. बांधलेले हजारो प्रकल्प अपूर्ण म्हणून त्यांच्या लाभक्षेत्रातील सर्व क्षेत्राला पाणी मिळत नाही तर शेकडो प्रकल्प अनंत काळ बांधकामाधीन म्हणून पाणीच अडत नाही. प्रकल्प 'पूर्ण' करण्यावर खर्च मात्र चालू राहतो. का न व्हावा सिंचन घोटाळा? का न पडावा दुष्काळ?

जलक्षेत्राचा मी एक सामान्य अभ्यासक. गेली अनेक दशके मी जलक्षेत्राचे निरीक्षण करतो आहे. माझे एक 'किरकोळ' निरीक्षण असे आहे की, आपले (विविध काळातील) जलसंपदा मंत्री जलनीती, ती अंमलात आणायची रणनीती व कायदे आणि आधुनिक तंत्रज्ञान व व्यवस्थापन याबद्दल काहीही अभ्यासपूर्ण दूरगामी भूमिकाच घेत नाहीत, परिस्थितीचा काटेकोर आढावा घेऊन डॅमेज कंट्रोलसाठी काही सकारात्मक पावले उचलणे तर लांबच राहिले. जलसंपदा मंत्री ही जबाबदारी घेणारच नसतील तर मग समित्यांच्या बाटल्या आणि आयोगांचे टँकर किती उपयोगी पडणार आहेत?

दोन-दोन सत्ताकेंद्रे, एका मागोमाग बाहेर येणारे घोटाळे, धोरण-लकवा, राज्यकर्त्यांची उदासीनता आणि या सर्वांना कंटाळून बदल मागणारी अस्वस्थ व संतप्त जनता या पार्श्वभूमीवर लोकसभा निवडणूक झाली. प्रचंड बदल झाले. महाराष्ट्रातील परिस्थिती फार वेगळी नाही. पाणी-प्रश्नामुळे राज्यात लागलेली आग विधानसभेच्या येत्या निवडणुकांत पाण्याच्या सरंजामशाही राजकारणाला जाळून भस्म करण्याची शक्यता नाकारता येणार नाही. पाणी हा निवडणुकीतला एक कळीचा मुद्दा बनेल का? बनावा. कारण कालव्यातून पाणी नाही, राजकारण वाहते!

***(लेखक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी) औरंगाबाद, येथील सेवानिवृत्त सहयोगी प्राध्यापक आहेत.)***

# मोदी मॉडेलचा पर्दाफाश

**सुलभा ब्रह्मे**

लोकसभेच्या निवडणुकीत भाजपला २८२ जागा मिळून मोदी सरकार २६ मे २०१४ रोजी सत्तारूढ झाले. गुजरातमधील मोदी विकासाचे मॉडेल (नमो) भारतभर लादण्याचा केंद्र सरकारचा इरादा आहे. तेव्हा त्यातील धोके लक्षात घेऊन त्याचा मुकाबला करण्यासाठी आवश्यक ते प्रबोधन व लोकसंघटन उभारायच्या तयारीला लगोलगच लागणे गरजेचे आहे. 'नमो'चा गाभा आहे परकीय गुंतवणूकदारांपुढे भगवे गालिचे! म्हणूनच अमेरिका आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांना कॉर्पोरेट भांडवलाचा भारतीय मुख्याधिकारी म्हणून मोदी पसंतीला आले. आणि म्हणून विदेशी-देशी बड्या कंपन्यांनी भरमसाठ पैसा पुरवून व प्रसार माध्यमांतून झंझावती प्रचार करून मोदींना सत्तारूढ केले.

तेव्हा आता बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या मोकाट संचाराचा धुमधडाका चालणारच! अणुवीज, महाकाय औद्योगिक पट्टे, शस्त्रास्त्रे, बँकिंग, रसायने, शेती, शिक्षण, व्यापार अशी सारी क्षेत्रे व्यापण्यासाठी त्यांच्यावर सुटी सवलतींची बरसात होणार आहे. त्याची किंमत सक्तीने जंगल-शेतजमिनीवरून उचलबांगडी करून लाखो आदिवासी व शेतकरी यांच्यावर लादली जाणार आहे. अनुदान कमी करून व महागाई, बेकारी वाढवून श्रमिक जनतेवर लादली जाणार आहे. कारण मोदी मॉडेल म्हणजे भारताभोवती महाकाय औद्योगिक पट्ट्यांचा विळखा! हजारो गावे, जंगलपट्टे, डोंगरदऱ्या उद्ध्वस्त करत आणि लाखो शेतकरी व अन्य श्रमिकांना देशोधडीला लावून बहुराष्ट्रीय व बड्या भारतीय कंपन्यांच्या तुंबड्या भरण्याचे षडयंत्र! मोदी मॉडेल म्हणजे दुष्काळ हटवण्याच्या नावाने रेटला जाणारा गंगा-कावेरी नदीजोड प्रकल्प! जागतिक तापमान वाढीमुळे हिमालयातील बर्फाच्छादनात घट होऊन गंगेचा बारमाही प्रवाह कमी होण्याचा धोका असताना कोट्यवधीचा निधी उधळून पर्यावरणीय विनाश व लाखोंचे विस्थापन करून गंगेचे पाणी कावेरीमध्ये पोहोचवण्याचा आतबट्ट्याचा प्रकल्प रेटून कंत्राटदारांच्या तुंबड्या भरण्याचा डाव! मोदी मॉडेल म्हणजे नर्मदा नदीवरील सरदार सरोवर धरणाची उंची वाढवण्यास हिरवा कंदील दाखवून मध्य प्रदेशातील लाखो आदिवासींची शेती, गावे, जंगले यांना जलसमाधी! मोदी मॉडेल म्हणजे विजेच्या तुटवड्याचे कारण पुढे करून जगभर नाकारल्या जात असलेल्या अणुवीज प्रकल्प उभारणाऱ्या परक्या कंपन्यांचे स्वागत! महागडी वीज व किरणोत्साराचा धोका भारतीय जनतेच्या माथ्यावर!

या महान संकटांशी मुकाबला करण्यासाठी 'नमो' द्वारा होणाऱ्या हल्ल्यांच्या स्वरूपाची माहिती करून घ्यावयास हवी. यातील औद्योगिक पट्ट्यांच्या विळख्याच्या संकटाची प्रस्तुत लेखात चर्चा करू.

दिल्ली-मुंबई, मुंबई-बंगलोर, बंगलोर-चेन्नई, चेन्नई-कोलकाता, कोलकाता-दिल्ली अशा महाकाय औद्योगिक पट्ट्यांचा भारतास विळखा घालून लाखो शेतकरी व अन्य श्रमिकांना देशोधडी लावण्याचा आणि 'जागतिक उत्पादक व व्यापारी मोहोल' प्रस्थापित करण्याचा भारतीय शासनाचा डाव आहे. काँग्रेस आघाडी शासनाने २००६ पासून या प्रकल्पांसाठी जमीन संपादन सुरू केले, ते विविध कायदे पुढे करून - रेल्वे मार्ग, औद्योगिक वसाहत, विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ), वनकायदा इ. प्रारंभी ही महाकाय योजना गुलदस्त्यात ठेवलेली होती. अर्थात् त्याची कल्पना सटोडिया, भू-माफिया आदींना होती.

रायगड जिल्ह्यातील माणगाव, रोहा तालुक्यांमध्ये अचानकपणे शेकडो एकर शेतजमीन, माळरान, डोंगराळ पट्टे खरेदीचा सपाटा सुरू झाला. धनदांडग्यांचे हस्तक, स्थानिक भू-माफिया, पुढारी आणि दलाल यांची मोठी साखळी या सट्टेबाजी जमीन खरेदीत गुंतली होती. रायगडमधील दिघी बंदर ते दिल्ली नजीक दादरी असा सुमारे १४५० कि.मी.लांबीचा व ३०० कि.मी. रुंदीचा औद्योगिक पट्टा उभारला जाणार असल्याने सट्टेबाजी जमीन खरेदीला उधाण आले. प्रशासन कवडी मोलाने जमीन संपादन करणार आहे, त्याहून 'बऱ्या' किंमतीत जमीन विकण्यास दलाल, वकील आदी मध्यस्थ यांनी शेतकऱ्यांना 'पटवून' जमीन खरेदीचा धुमधडाका चालू केला.

दिघी-दादरी औद्योगिक पट्टा योजना : महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान, दिल्ली, हरयाणा, उत्तर प्रदेश या राज्यांमधून रेल्वेचा जलदगती मालवाहतूक मार्ग व त्याच्या लगतच्या सध्याच्या मुंबई-दिल्ली मार्गात सुधारणा आणि या मार्गावर ११ मोठी गुंतवणूक क्षेत्रे व १३ औद्योगिक क्षेत्रे उभी करण्याची योजना आहे. जपान सरकारचे अर्थ, व्यापार व उद्योग मंत्रालय व भारत सरकारचे अर्थ, व्यापार व प्रोत्साहन विभाग यांच्यामध्ये, संसद व भारतीय जनता यांना पूर्ण अंधारात ठेवून याबाबतचा करार करण्यात आला. प्राथमिक अंदाजानुसार त्यासाठी ३.५० लाख हेक्टर शेतजमिनीचे संपादन केले जाऊन त्यामुळे लाखो शेतकऱ्यांचे, ग्रामस्थांचे विस्थापन होईल. यातील पहिल्या टप्प्यामध्ये महाराष्ट्रातील दिघी बंदर व नाशिक सिन्नर, इगतपुरी, धुळे, औरंगाबाद येथे गुंतवणूक क्षेत्रे उभारण्याची योजना आहे. पुढील टप्प्यात पुणे-खेड भागात व पुणे-वसई मार्गावर औद्योगिक क्षेत्रे, नाशिक व पुणे येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ, जंजिरा-मुरुडजवळ अत्याधुनिक बंदरे विकसित करण्याचा प्रस्ताव आहे.

या प्रकल्पासाठी सध्या ५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित आहे. 'जपान बँक फॉर इंटरनॅशनल को-ऑपरेशन'कडून मोठे कर्ज ६ टक्के दराने घेऊन हा प्रकल्प सुरू होणार आहे. जपानच्या कर्जामागील उद्देश आहे जपानी उद्योगांनी भारतातील साधनसंपत्ती व बाजारपेठ काबीज करण्याचा. जागतिक बँक, आशिया विकास बँक व अन्य बँकांकडूनही कर्जे घेतली जातील. एवढे मोठे परकीय कर्ज घेऊन परकीय कंपन्यांना भारतातील जमीन, पाणी, खनिजे आदी बहाल करून परकीय उद्योग व निर्यात व्यापार याची भरभराट साधली जाणार आहे. तेथील सुविधांचा फायदा परकीय कंपन्यांशी देवाण-घेवाण करणाऱ्या भारतीय उद्योग व व्यापारास मिळेल असेही या प्रकल्पासंबंधीचे संकल्पना पत्र म्हणते. पाच वर्षांत रोजगार दुप्पट होणार अशी अपेक्षा व्यक्त केलेली आहे. यासाठी किंमत किती मोजली जाणार व त्याचा भार कोणावर पडणार आहे याची फिकीर करण्याची गरज काँग्रेस शासनाला वाटत नव्हती.

गुजरात मॉडेलचे तर वैशिष्ट्यच आहे की, आदिवासी, शेतकरी, मच्छिमार, कारागीर, कामगार अशा सर्व श्रमिकांना भरडून 'औद्योगिक

विकास' करायचा. या प्रकल्पाखालील अहमदाबाद-ढोलेरा गुंतवणूक क्षेत्राचे काम सुरू करण्यात आलेले आहे. ढोलेरा बंदर भागाला विशेष गुंतवणूक क्षेत्राचा (स्पेशल इन्व्हेस्टमेंट रीजन-एस्.आय.आर.) दर्जा देऊन भूसंपादनासाठी व्यापक अधिकार देणारा 'एस.आय.आर.' कायदा लागू करून २२ खेड्यातील ९२२५ हेक्टर जमीन सक्तीने ताब्यात घेण्यात येणार आहे. तेथील जमिनीस नर्मदा प्रकल्पाखाली सिंचनाची सुविधा मिळणार आहे. ही जमीन विशेष सुपीक आहे. हेक्टरी ३.८ टन गहू तर जिऱ्यापासून हेक्टरी ३ लाख रुपये नक्त उत्पन्न मिळते. या प्रकल्पा विरोधात 'जमीन अधिकार आंदोलन' समवेत शेतकऱ्यांचा अटीतटीचा लढा चालू आहे. गुजरातमधील मुख्यमंत्रीपदाच्या कारकिर्दीत मोदी यांनी लाखो आदिवासी, शेतकरी, मच्छीमार, पशुपालक आदी श्रमिकांची निर्वाहसाधने नष्ट करून, गावेच्या गावे उठवून अदानी, टाटा, अंबानी आदी बड्या कंपन्यांच्या थैल्या भरल्या. आता तर संसदेमध्ये भाजपला बहुमत मिळून मोदी पंतप्रधान बनून 'अध्यक्षीय' पद्धतीप्रमाणे आपल्या हातात अमर्याद सत्ता केंद्रित करून राहिले आहेत. परकीय गुंतवणुकीच्या कुबड्यांविना भारताचा विकास अशक्य आहे हा मोदीमंत्र आहे. तेव्हा औद्योगिक पट्ट्यांचा विळखा भारताभोवती वेगाने आवळण्याची शर्थीची धडपड मोदी करणारच. आज या विविध केंद्रांमध्ये शेतकऱ्यांचे लढे चालू आहेत. त्यांचे एकसूत्रीकरण करून महाराष्ट्रामध्ये मुंबई नजिकच्या रिलायन्स सेझ आणि मुंबई-दिल्ली औद्योगिक पट्टा प्रकल्प अंतर्गत दिघी बंदर या विरोधात शेतकऱ्यांनी एकजुटीने लढा देऊन हे प्रकल्प हटवले तशीच झुंझार लढत सर्वत्र देण्याची जोरदार तयारी करणे गरजेचे आहे.

### दिघी बंदर विस्तारविरोधी लोकलढा

या परिसरामध्ये रिलायन्सचा सेझ प्रकल्प मोठ्या चिकाटीने प्रदीर्घ लढा देऊन हटवण्याचा अनुभव व आत्मविश्वास कार्यकर्त्यांमध्ये होता. अनेक अफवा पद्धतशीरपणे पसरवून शेतकऱ्यांचा बुध्दिभेद चालू होता. वाचवायला जमीन शिल्लकच कोठे आहे ? एवढा मोठा आंतरराष्ट्रीय प्रकल्प, तो सरकार रेटणारच, त्याने आपल्या भागाचा विकास होईल, रोजगार मिळेल, नाहीतरी शेती तोट्यातच चालली आहे तेव्हा ती वाचवायची कशाला ?

या प्रकल्पासाठी रायगड जिल्ह्यातील माणगांव, रोहा व तळा या तालुक्यांतील ७८ गावांमधील १७,५०० हेक्टर जमीन संपादित होणार होती. 'दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉरविरोधी शेतकरी समिती' स्थापन करून सर्व शेतकऱ्यांपर्यंत प्रश्नाची माहिती पोचवून संघटन करण्यात आले. १८ ऑक्टोबर २०१२ रोजी प्रांताधिकारी कचेरीवर विराट मोर्चा नेऊन शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर केलेल्या संपादनाच्या नोंदी रद्द करा, धनदांडग्यांचे हित पाहणारा हा प्रकल्प रद्द करा अशा मागण्यांचे निवेदन प्रांताधिकाऱ्यांना देण्यात आले. त्याकडे दुर्लक्ष करून प्रांताधिकारी तथा भूसंपादन अधिकारी यांनी पाच गावांतील शेतकऱ्यांना भूसंपादनासाठी नोटिसा काढल्या. एकदम असंतोष उफाळून येऊ नये म्हणून लहान गावात प्रथम नोटिसा काढल्या. त्या प्राप्त होताच हरकतीचे नमुने शेतकऱ्यांकडून भरून घेऊन भूसंपादन अधिकाऱ्यांकडे हरकती दाखल केल्या. १० एप्रिल २०१३ पासून भूसंपादन अधिकारी, माणगाव येथे बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले. परिणामी भूसंपादनाची प्रक्रिया तात्पुरती स्थगित करण्यात आली. स्थानिक शेतकऱ्यांची पोलादी एकजूट आणि एक इंचही जमीन ताब्यात न देण्याचा निर्धार यामुळे अखेर केंद्र शासनाने दिघी बंदर विभाग प्रकल्पातून वगळण्याचे पत्र राज्य शासनाला दिले.

औद्योगिक वसाहत किंवा सेझखाली जमीन संपादनाचा शासनाचा प्रयत्न व त्याविरोधात शेतकऱ्यांनी संघटित लढा उभारला असल्याने, औद्योगिक पट्ट्यातील प्रस्तावित केंद्रे रद्द करून घेण्यासाठी विविध ठिकाणचे शेतकरी संघटित होत आहेत. औरंगाबाद जिल्ह्यातील शेंद्रा-बिडकीन परिसरातील औद्योगिक केंद्र रद्दबातल करून घेण्याचा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी चंग बांधला आहे. धुळे येथील नरडाणा औद्योगिक केंद्रासाठी जमीन संपादन नोटिसीस हरकतीपत्रे ग्रामस्थांनी संबधित अधिकाऱ्यांना दिली आहेत. पुणे जिल्ह्यातील कार्ला येथेही सामना देण्याची प्रकल्पग्रस्तांनी तयारी केलेली आहे. या विविध आंदोलनांचे व संघटनांचे एकसंघीकरण करणे महत्त्वाचे आहे.

पैशाचे गाजर लटकवून, नोकरीचे आमिष दाखवून शेतकऱ्यांमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न, धमक्या अशा विविध मार्गे जमिनी हस्तगत करण्याची शिकस्त चालू आहे. एकरकमी पैसा हाती आला की त्याला अनेक पाय फुटतात. शिवाय महागाई वेगाने वाढत असल्याने रुपयाची किंमत घसरत असते. उलट जमिनींची उत्पादन क्षमता वाढवून उत्पन्न वाढ साधणे शक्य आहे. जमिनीबरोबर, आपले गाव, घर सारेच सोडावे लागले तर कामाची भीक मागण्याची वेळ येते. कामाची शाश्वती नसणारच. पक्का निवारा तर मिळणे अशक्यच. तेव्हा आज सर्व ग्रामस्थांनी एकजुटीने जमीन वाचवणे, गाव वाचवणे आणि तीच एकजूट कायम ठेवून व शेती-आधारित उद्योग-व्यवसाय वाढवण्यासाठी एकत्रित प्रयत्न केले तर गावातला रोजगार वाढवता येईल, उत्पन्न वाढवता येईल, आपल्या परिसरात ताठ मानेने जगता येईल. त्यासाठी मोदी मॉडेलचा बुलडोझर मात्र एकजुटीने लढा देऊन रोखण्याची ऐतिहासिक जबाबदारी आपणा सर्वांवर आहे.

□□□

# जालना : बांधकाम कामगारांना अनुदानाचे चेक वाटप

सीटू युनियनच्या प्रयत्नामुळे महाराष्ट्रामध्ये बांधकाम कामगारांसाठी शासनाने काही योजना जाहीर केल्या आहेत. अपघात योजना, मुलांना शिष्यवृत्ती, आरोग्य विमा, घरांसाठी अनुदान, महिलांना प्रसूतीसाठी अनुदान इ. योजना जाहीर केल्या आहेत. तसेच या कामगारांना साहित्य घेण्यासाठी प्रत्येकी रु. ३०००/- शासनाने जाहीर केले आहेत. या योजनांद्वारे सीटू भवन, जालना येथे दि. २१ जून रोजी ११३ बांधकाम कामगारांना एकूण ३ लाख ३९ हजार रुपयांचे अनुदानाचे चेक वाटप करण्यात आले. कामगार उपआयुक्त एन. एन. इटकरी यांच्या सहकार्याने झालेल्या या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी सीटूचे राज्य सचिव अण्णा सावंत होते व प्रमुख पाहुणे सरकारी कामगार अधिकारी सतिश तोटावार हजर होते. त्यांचे हस्ते कामगारांना चेकचे वाटप करण्यात आले. यावेळी वक्त्यांनी या कामगारांसाठी असलेल्या योजनांची सविस्तर माहिती दिली. प्रास्ताविक मधुकर मोकळे यांनी सूत्रसंचालन गोविंद आर्डड यांनी केले. कार्यक्रमाला सरकारी कामगार अधिकारी, कार्यालयातील कर्मचारी हजर होते. बांधकाम कामगार मोठ्या संख्येने हजर होते.

या कार्यक्रमासाठी काशिनाथ पाटोळे, सय्यद रफिक, सय्यद युनूस, शिवाजी राठोड, शेख नासेर, सुभाष मोहिते, दिगांबर टेकाळे, रामा गोळेकर, मधुकर पटेकर, भिमराव हारे, अंबादास गायकवाड, मारोती गुंजाळ, राजु बाबू पवार आदींनी परिश्रम घेतले.

**– गोविंद आर्डड**

# पाणी का गढूळ झाले?

**प्रदीप पुरंदरे**

दिवसेंदिवस बिकट होत चाललेल्या सिंचन व एकूणच पाणी-प्रश्नाकडे जास्त गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. महाराष्ट्रातील पाणी-प्रश्नाचे सखोल व समग्र आंतरशाखीय विश्लेषण नव्याने होणे आवश्यक आहे. पाणी का गढूळ झाले आहे? या प्रश्नाची उत्तरे पूर्वग्रह व अभिनिवेश बाजूला ठेवून आता मिळवायला हवीत. कप्पेबंद पद्धतीने सुटासुटा विचार करणे, बदललेले संदर्भ लक्षात न घेणे, आधुनिक तंत्रज्ञान व व्यवस्थापनाकडे गुन्हेगारी स्वरूपाचे दुर्लक्ष करणे आणि ठेकेदार-पुढाऱ्यांच्या 'व्यवहारी मार्गदर्शनाखाली' पाण्याचे सरंजामशाही राजकारण करणे ही महाराष्ट्राच्या जलक्षेत्राची (वॉटर सेक्टर) आज व्यवच्छेदक लक्षणे बनली आहेत.

मृद व जल संधारण, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) आणि राज्यस्तरीय लघु, मध्यम व मोठे सिंचन प्रकल्प अशा विविध 'वॉटर टाईट' कप्प्यांमध्ये आज विचार केला जातो. जलविकासाची ही सर्वच अंगे स्थळ, काळ व परिस्थितीनुसार आवश्यक आहेत. त्यातील स्वाभाविक विसंगतीचे सुयोग्य व्यवस्थापन करूनच पुढे जावे लागेल. त्यांना एकमेकांचे शत्रू मानून बाष्कळ वाद उभे करण्याने राज्याचे नुकसान होत आहे.

पुलाखालून (का धरणाच्या सांडव्यावरून?) खूप पाणी वाहून गेले आहे. संदर्भ व एकूणच सर्व परिस्थिती बदललेली आहे. विहिरी, मृद व जल संधारण, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर), कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, उपसा सिंचन योजना आणि राज्यस्तरीय लघु, मध्यम व मोठे सिंचन प्रकल्प या द्वारे लक्षणीय जलविकास झाला. पाणी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाले. साठवण क्षमता वाढली. पाण्याचे समन्यायी वाटप व कार्यक्षम वापर मात्र झाला नाही. पर्यावरणाकडे दुर्लक्ष झाले. लोकसंख्येत वाढ झाली. औद्योगिक विकास व शहरीकरणाने वेग घेतला. मध्यमवर्गाचा टक्का लक्षणीय झाला. शहरी मतदार संघात भर पडली. राहणीमानाच्या कल्पना बदलल्या. पिण्याचे व घरगुती वापराचे तसेच औद्योगिक वापराचे पाणी जास्त लागू लागले. या 'बिगर सिंचनाची' मागणी वाढली. एकूण जीवन शैलीतच बदल झाला. फक्त सिंचनाकरिता बांधलेल्या प्रकल्पांतून बिगर सिंचनाचीही गरज भागवली जाऊ लागली. पाण्यात तालेवार वाटेकरी निर्माण झाले.

विजेची उपलब्धता वाढली. पाणी उपसा करणारी बकासुरी यंत्रे व भूमिगत पीव्हीसी पाईप लाईन आल्या. विहिरी, नदीनाले, जलाशय आणि कालवे या सर्व जलस्त्रोतातून पाण्याचा बेबंद उपसा व्हायला लागला. भूजलाची पातळी खालावली तर प्रवाही सिंचनाखालचे क्षेत्र रोडावले. खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण आले. कल्याणकारी शासनाची संकल्पना मागे पडली. एकेकाळची 'सामाजिक वस्तू' (सोशल गुड) आता 'आर्थिक वस्तू' (इकॉनॉमिक गुड) मानले जाऊ लागले. टँकर व बाटलीबंद पाण्याद्वारे पाण्याचा बाजार वाढला. शेती व सिंचनातील गुंतवणूक तुलनेने कमी झाली. सेवाक्षेत्राचे महत्व वाढले. शेतीवरचा भार हलका करण्याची भाषा सुरू झाली. एकेकाळची 'उत्तम शेती' आता लोक एन. ए. करायला लागले. खरीप व रब्बी हंगामातील भूसार पिकांच्या 'उदरनिर्वाहाच्या शेती' ऐवजी उन्हाळी व बारमाही नगदी पिकांची 'बाजारासाठी शेती' व्हायला लागली. विशिष्ट जनसमूह व विभागांना विकासाची संधी नाकारण्यासाठी पाण्याचा उपयोग एक शस्त्र म्हणून केला जायला लागला.

जल व सिंचन विषयक नवनवीन कायदे खूप आले. मात्र त्यांच्या अंमलबजावणी अभावी जलक्षेत्रात कायद्याचे राज्य कधी आलेच नाही. महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ या कायद्याचे नियम ३८ वर्षे झाली तरी अद्याप करण्यात आलेले नाहीत. नदी, लाभक्षेत्र व कालवा अधिकाऱ्यांच्या नेमणुका याबद्दलच्या अधिसूचनांचे मूलभूत काम अर्धवट आहे. तरीही तो कायदा अंमलात आहे असे गृहीत धरून आपण जलनियमन (!) करणारे देशातले एकमेव 'पुरोगामी' राज्य आहोत! दुनिया झुकती है आणि झुकानेवाल्यांच्या हातीच पाण्याचे सगळे अधिकार आहेत. आणि म्हणून तर ते उघडपणे सांगत आहेत की, मते दिलीत तरच पाणी मिळेल. ('तुम मुझे व्होट दो, मै तुम्हे पानी दुंगा!' सुभाषबाबू, माफ करा!) परिस्थिती अशी विपरित असताना आणि सगळेच संदर्भ बदललेले असताना गरज आहे ती चाकोरीबाहेरचे कठोर उपाय योजण्याची. पण महाराष्ट्रात मात्र 'आघाडी' आहे ती शिरपूर पॅटर्न आणि नदीजोड प्रकल्पासारख्या अव्यवहार्य, अशास्त्रीय, अतिशयोक्त व परस्परविरोधी 'रामबाण व राष्ट्रवादी' उपायांची!

एकविसावे शतक सुरू होऊन जमाना झाला हे अद्याप जलक्षेत्राच्या गावीही नाही. इतर सर्व क्षेत्रांत आधुनिक तंत्रज्ञान व व्यवस्थापना आधारे मर्यादित अर्थाने का होईना काही ना काही बदल झाले. पण जलक्षेत्र मात्र अजूनही 'हम अंग्रेजोंके जमानेके जेलर है' यापुढे सरकायला तयार नाही. पाण्याचे खरेखुरे अभियांत्रिकी नियंत्रण, नियमन व मोजमाप आज होत नाही. भिजलेले पीक-क्षेत्र मोजले जात नाही. शास्त्रीय निकषांआधारे जलव्यवस्थापन होत नाही. पुढाऱ्यांचा आदेश हाच एकमेव निकष! बहुसंख्य प्रकल्पांत बंदोबस्त व जुगाड या पलिकडे काहीही होत नाही. पण तरीही सिंचनस्थितीदर्शक, जललेखा व बेंचमार्किंगचे धादांत खोटे अहवाल प्रकाशित करण्याचे उद्दाम धाडस मात्र अनेक वर्षे केले जात होते. प्रस्तुत लेखकाने शेवटी सन २००९-१० सालच्या जललेखा अहवालास २०११ साली अधिकृतरित्या आक्षेप घेतला. वर्तमानपत्रात लेख लिहिला. जल संपदा विभागाने नेहमीप्रमाणे सोयीस्कर मौन पत्करले. पण - योगायोग म्हणा हवे तर - त्यानंतर वर नमूद केलेल्यापैकी एकही अहवाल आजतागायत प्रकाशित झालेला नाही. विधानमंडळाला सादर करावयाच्या आर्थिक सर्वेक्षण अहवालात सिंचन विषयक माहिती उपलब्ध नाही असे शासनास अंतिमतः म्हणावे लागले ही वस्तुस्थिती बोलकी नव्हे काय?

मृद व जलसंधारण आणि लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) या करिता देखभाल-दुरुस्ती, संनियंत्रण व मूल्यमापन आणि व्यवस्थापनाची काय अधिकृत व्यवस्था आहे? राज्यस्तरीय लघु, मध्यम व मोठे सिंचन प्रकल्प यांच्या बाबतीत मात्र तशी व्यवस्था निदान कागदोपत्री तरी आहे. पण काही मोजके सन्माननीय अपवाद वगळता ती कार्यरत आहे का? 'बांधा आणि विसरा' अशा प्रकारच्या आपल्या बहुसंख्य सिंचन प्रकल्पांची प्रत्यक्ष 'एकूण प्रकल्पीय कार्यक्षमता' फक्त २०-२५% एवढीच आहे. त्या 'कार्यक्षमतेत' जलक्षेत्राचे प्रतिबिंब पहायला मिळते. बाष्पीभवन, पाझर, गळती आणि पाणी-चोरी या पलिकडे असंख्य प्रकल्पांत काहीही होत नाही.

*(पान ७ पहा)*

## घरकामगारांची मागणी परिषद... पान १५ वरून

घरकामगारांचा लढा म्हणजे एकीकडे आर्थिक शोषणाविरुद्ध तर दुसरीकडे आत्मसन्मानासाठी आहे असे त्यांनी मांडले. घरकामगारांचे आर्थिक शोषण थांबवायचे असेल तर प्रथम त्या ज्या परिस्थितीत काम करतात, त्याचे कायदेशीर नियमन झाले पाहिजे. इतर कामगारांप्रमाणे घरकामगारांच्या सेवाशर्ती निश्चित व्हायला हव्यात. त्यांना सुद्धा किमान वेतन, नियमित कामाचे संरक्षण, महागाई भत्ता, आठवड्याची सुट्टी, विविध प्रकारच्या पगारी रजा, बोनस, स्त्रियांसाठी बाळंतपणाची पगारी रजा, कामाच्या ठिकाणी लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण तसेच विमा, निवृत्ती वेतन, इत्यादींसारख्या सामाजिक सुरक्षा योजना मिळायला पाहिजेत आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक कायदेशीर कवच गरजेचे आहे. १६ जून २०११ रोजी आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेने (आय.एल.ओ.) घरकामगारांच्या सन्मानजनक कामासंबंधी जी सनद पारित केली (२०११/क्र.१८९) त्यावर भारत सरकारने सही केलेली नाही; ह्याचा निषेध करून, ती त्वरित मंजूर करावी आणि त्यानुसार आपल्या देशात घरकामगारांच्या आर्थिक व सामाजिक सुरक्षिततेसाठी ठोस पावले उचलावीत अशी मागणी त्यांनी केली. त्याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्र सरकारने घरकामगारांना किमान वेतन कायदा लागू करावा व त्यासाठी अर्थतज्ज्ञ आणि संघटनांच्या प्रतिनिधींची ताबडतोबीने समिती स्थापन करावी, आणि दरम्यान एका तासाच्या कामासाठी किमान वेतन रु. ४० लागू करावे, अशीही मागणी त्यांनी केली.

त्याचबरोबर राज्य सरकारने जे घरेलू कामगार कल्याणकारी मंडळ स्थापन केले आहे, ते सशक्त करण्यासाठी किमान रु. १०० कोटींची अर्थसंकल्पात तरतूद करावी, घरकामगारांच्या नोंदणीचे वय किमान ७० वर्षांपर्यंत वाढवावे, एल.आय.सी.च्या जनश्री विमा योजना आणि राष्ट्रीय स्वास्थ्य बीमा योजनेचा लाभ सर्व नोंदित घरकामगारांना मिळावा, किमान ३००० रुपये मासिक पेन्शन देण्याची योजना तयार करावी, मंडळाकडून घरकामगार महिलांसाठी पाळणाघर योजना राबवण्यात यावी, सर्व घरकामगारांना अन्न सुरक्षा कायदा २०१३ अंतर्गत प्राधान्यक्रम कुटुंबाचे, व त्यांच्यातील विधवा, परित्यक्त्या व एकल महिलांना अंत्योदय कुटुंबाचे कार्ड मिळावे, त्यांना दारिद्र्यरेषेचे कार्ड देऊन लागू असलेल्या सर्व योजनांचा लाभ मिळावा, त्यांच्यासाठी स्वस्त घरकुल योजना राबवण्यात यावी, इत्यादी मागण्यांचा मसुदा त्यांनी परिषदेसमोर मांडला. सुलभ कारभारासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र मंडळ स्थापन करावे अशी सुद्धा त्यांनी मागणी केली.

ठरावावर विविध जिल्ह्यांतील अनेक महिला प्रतिनिधींनी आपली मते व्यक्त करीत असताना घरकामगारांना ज्या अडचणींना सामोरं जावं लागतं, त्याचे वर्णन केले. पार्वतीबाई जाधव (इचलकरंजी-कोल्हापूर), शारदा कदम (नाशिक), छाया सावंत (पुणे), अपर्णा दराडे (पिंपरी-चिंचवड), सुवर्णा रेवले (बीड), सुरेखा जाधव (मुंबई) आणि ताराबाई महाजन (जळगाव) ह्यांची भाषणे झाली. महागाई, आरोग्याचे प्रश्न, आपल्या मुलींचे शिक्षण, त्यांची सुरक्षितता, पोलिसांकडून होणारा त्रास, मालकांकडून झालेला लैंगिक छळ, ह्यांबद्दल त्यांनी आपले जिवंत अनुभव सांगितले. त्याचबरोबर युनियनमुळे आपले आयुष्य कसे मूलभूत पद्धतीने बदलून गेले आणि संघटित झाल्यानंतर आपल्यात कसे बळ आले, हेसुद्धा आवर्जून सांगितले. परिषदेत मांडलेल्या मागण्यांना पाठिंबा देत असताना, लढा केल्याशिवाय त्या मंजूर होऊ शकत नाहीत, असे स्पष्ट शब्दांत त्यांनी आवाहन केले.

परिषदेसाठी महाराष्ट्र सरकारच्या कामगार खात्याच्या पुणे विभागाचे वरिष्ठ अधिकारी सहाय्यक कामगार आयुक्त संभाजी मोरे आणि बी. आर. देशमुख ह्यांना आमंत्रित केले होते. त्यांनी घरकामगारांच्या मागण्यांबद्दल सकारात्मक दृष्टीकोनातून शासन विचार करीत असल्याचे सांगितले आणि कोणत्या योजना अंमलात आणल्या जातील ह्याची माहिती दिली.

परिषदेचे अध्यक्ष माजी आमदार आणि सीटूचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष नरसय्या आडम मास्तर यांच्या स्फूर्तिदायक भाषणाने परिषदेचा समारोप झाला. देशातल्या राष्ट्रपतींपासून माजी आमदारांसाठी पेन्शनची तरतूद आहे. परंतु देशातल्या ३७ कोटी असंघटित कामगारांच्या पेन्शनसाठी सरकारकडे पैसा नाही, अशी टीका त्यांनी केली. भांडवलदारांना प्रचंड सवलती देणाऱ्या महाराष्ट्र सरकारने आपली तिजोरी झटकली तर घरकामगारांच्या पेन्शनसाठी निश्चित पैसे निघतील, त्यामुळे पेन्शनच्या मागणीचा पाठपुरावा करण्यासाठी सर्व जिल्ह्यांत १२ जून रोजी सीटूतर्फे निदर्शने करावीत आणि येत्या काळात सरकारला वठणीवर आणण्यासाठी मोठी संघटित ताकद तयार करावी अशी हाक त्यांनी दिली. आगामी विधानसभेच्या निवडणुकांची पार्श्वभूमी लक्षात घेऊन आपला लढा अधिक तीव्र करण्याचे आवाहन त्यांनी केले.

परिषदेचे आभार प्रदर्शन सीटूचे जिल्हा सचिव वसंत पवार ह्यांनी केले. परिषदेसाठी सीटूचे राज्य पदाधिकारी दत्ता माने, अमृत मेश्राम, आरमायटी इराणी, कामगार नेते नर्सिंग म्हेत्रे, मारुती वाघमारे, सिंधू शार्दुल तसेच जनवादी महिला संघटनेच्या राज्य सचिव सोन्या गिल उपस्थित होत्या. शोक प्रस्ताव पुणे जिल्ह्याच्या सचिव सरस्वती भांदिर्गे यांनी मांडला. अध्यक्षीय सूचनेला खजिनदार रेखा कांबळे ह्यांनी अनुमोदन दिले. सुभद्रा खिलारे, संगीता लोळगे, संगीता केंद्रे ह्यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. जया घाडगे, पद्मा शिंदे, जयश्री साळुंखे, रेखा आल्हाट, लता गायकवाड, अंबिका शिताप, विद्या झपके, शालन धोत्रे, कांचन वाल्गुडे, राधाबाई वाघमारे, सुनीता घोडके, प्रियंका पासलकर, सावित्रीबाई कांबळे, शर्मिला जाधव, शकुंतला देशमुख, अनुजा घाणेकर, खातून सय्यद, लता काकडे, निर्मला राजपूत, नंदा शिंदे, डिंपल साबळे इत्यादी घरकामगार संघटनेच्या कार्यकर्त्या, तसेच सीटू पुणे येथील कार्यकर्ते श्रीमंत घोडके, भारती अवसरे व इतरांच्या परिश्रमामुळे परिषद यशस्वी झाली.

**– किरण मोघे**

# किनवट : रेल्वे दरवाढीविरुद्ध धरणे आंदोलन

२५ जून २०१४ रोजी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व डीवायएफआयच्या वतीने माकपचे राज्य कमिटी सदस्य अर्जुन आडे आणि डीवायएफआयचे राज्य सचिवमंडळ सदस्य जनार्धन काळे यांच्या नेतृत्वाखाली उपविभागीय अधिकारी कार्यालय, किनवट, नांदेड येथे मोदी सरकारच्या रेल्वे भाडेवाढ व माल वाहतूक दरवाढीचा निषेध करून धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी 'अच्छे दिन आयेंगे' असे सांगून फसवणूक करणाऱ्या मोदी सरकारचा जाहीर धिक्कार करण्यात आला. त्याबरोबर बंगालच्या डीवायएफआय व माकपच्या कार्यकर्त्यांवरील हल्ल्यांचा तीव्र निषेध करण्यात आला आणि हे हल्ले त्वरीत थांबविण्यासाठी केंद्र सरकारने ठोस पावले उचलावीत, त्याचबरोबर सरकारने संरक्षणक्षेत्रात १०० टक्के विदेशी गुंतवणुकीचा घेतलेला निर्णय परत घ्यावा, प्रस्तावित डिझेल, पेट्रोलची मासिक दरवाढ रद्द करावी आणि पेरणीसाठी आर्थिक साहाय्य करून कोरडा दुष्काळ जाहीर करावा व त्या अनुषंगाने शेतकऱ्यांचे थकीत वीज बिल, थकित पीक कर्ज, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करण्यात यावे व वनाधिकार कायद्यानुसार नवाटी दावेदारांना रहिवासी आणि ताबा या दोन पुराव्या आधारे पट्टे नावे करण्यात यावे अशा आशयाचे निवेदन नायब तहसिलदार बनसोडे यांना देण्यात आले.

किसान सभेचे व डीवायएफआयचे १०० हून अधिक कार्यकर्ते या आंदोलनात सहभागी झाले होते. त्यात मोहन जाधव, नंदु मधुकर, शेषराव ढोले, शेख चाँद, धनराज आडे, गणेश राठोड, अमोल आडे, परमेश्वर गवळी, सुनिल राठोड आदी कार्यकर्त्यांचा समावेश होता.

**– जनार्धन काळे**

# जनवादी महिला संघटनेचे ठाणे जिल्हा अभ्यास शिबिर

दरवर्षी मे-जूनच्या महिन्यात जनवादी महिला संघटनेच्या ठाणे जिल्हा कमिटीच्या वतीने कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षणासाठी राजकीय-वैचारिक-संघटनात्मक शिबिर घेण्यात येते. यावर्षी ग्रामबाल शिक्षण केंद्र, कोसबाड, ता. डहाणू येथे असे शिबिर घेण्यात आले.

जनवादी महिला संघटनेच्या ठाणे जिल्हा अध्यक्षा लहानी दौडा यांच्या प्रास्ताविकानंतर किसान सभेचे नेते एल. बी. धनगर यांनी शिबिराचे उद्घाटन केले. धनगर यांनी कॉ. गोदावरी परुळेकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या ऐतिहासिक वारली उठावामधल्या काही उत्साहवर्धक प्रकरणांबाबत माहिती दिली. वेठबिगारीच्या विरोधात संघर्ष संघटित करत असताना डाव्या चळवळीतील कार्यकर्त्यांना प्रचंड कष्ट करावे लागले. परंतु आधी ब्रिटिश व नंतर काँग्रेस सरकारचा पाठिंबा असलेल्या जमीनदार-सावकर-पोलीस युतीच्या सर्व दडपशाहीचा मुकाबला करून त्यांनी लढा दिला आणि शेवटी वेठबिगारीला मूठमाती दिली. महिलांचा या लढ्यात मोठा सहभाग होता. एक शोषणविरहित, न्याय्य समाज बनविण्यासाठी डावी, धर्मनिरपेक्ष व लोकशाहीवादी चळवळ पुढे नेण्याची आज गरज आहे, असे धनगरांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात सांगितले.

सीटूचे नेते डॉ. एस. के. रेगे यांनी अत्यंत सोप्या व साध्या पद्धतीने 'सद्य राजकीय परिस्थिती आणि आपल्यासमोरील कार्ये' या विषयावर मार्गदर्शन केले. जनवादी महिला संघटनेच्या राज्य अध्यक्षा मरियम ढवळे यांनी 'महिला संघटनेचे महत्व आणि संघटना बांधणी' या विषयाची मांडणी केली. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अण्णा कडलास्कर यांनी 'वैज्ञानिक दृष्टिकोनाचे महत्व आणि अंधश्रद्धेविरुद्ध संघर्ष' या विषयावर मार्गदर्शन केले तसेच बुवाबाजीचा पर्दाफाश करणारे काही प्रयोगही सादर केले. ग्राहक संरक्षण सेवा समितीच्या सविता गव्हाणे यांनी ग्राहकांच्या हक्काबाबत महिलांना माहिती दिली. ठाणे जिल्ह्यातील महिला व बाल विकास खात्याचे अधिकारी देवकर यांनी महिला अत्याचारविरोधी वेगवेगळ्या कायद्यांची माहिती दिली तसेच महिलांसाठी काही सरकारी योजनाही समजावून सांगितल्या. यावेळी कायदा व योजनांबाबतच्या छोट्या पुस्तिकांचे महिलांना वाटप करण्यात आले.

तलासरी, डहाणू, पालघर, विक्रमगड, वाडा व शहापूर या ६ तालुक्यांतून ७२ प्रमुख महिला कार्यकर्त्या या शिबिरासाठी हजर होत्या. परंतु तालुका पातळीवरील कार्यकर्त्यांसाठीही शिबिरांची आवश्यकता ओळखून १० ते २४ मे दरम्यान तलासरी, डहाणू, पालघर, विक्रमगड, शहापूर आणि वाडा तालुक्यांत तालुका शिबिरे आयोजित करण्यात आली होती. या तालुका शिबिरांसाठी गाव कमिट्यांच्या काही प्रमुख कार्यकर्त्यांना निवडण्यात आले होते. एकूण ७७ गावांतील ३५० महिला या सर्व तालुका शिबिरांना हजर होत्या.

२८ मे रोजी सायंकाळी तालुकावार गटचर्चेनंतर तालुक्याच्या अध्यक्षा व सचिवांनी त्या गटचर्चेचा सारांश शिबिरार्थींसमोर मांडला. तालुक्यात कोणते प्रश्न आहेत? आंदोलने कशी संघटित करणार? आणि संघटना बांधणी कशी करावी? याबाबत मांडणी करण्यात आली. हे सत्र चांगले प्रेरणादायक ठरले.

शिबिराची सांगता माजी खासदार लहानू कोम यांच्या समारोपीय भाषणाने झाली. महिलांच्या राजकीय-वैचारिक-संघटनात्मक जाणीवा वाढविण्यासाठी नियमित शिबिरे आयोजित करणाऱ्या जनवादी महिला संघटनेच्या ठाणे जिल्हा कमिटीचे त्यांनी अभिनंदन केले. जिल्ह्याच्या नवीन विभागात महिला संघटनेच्या कामाचा विस्तार करून महिलांची मजबूत संघटना आणि चळवळ बांधली जाईल ही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच तरुण आणि शिकलेल्या महिलांचा सहभागही पुढच्या काळात वाढविण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. जनवादी महिला संघटनेच्या ठाणे जिल्हा सचिव संगीता ओझरे व ठाणे जिल्हा कोषाध्यक्षा रसीला धोडी यांनी सूत्रसंचालन केले. जोरदार घोषणांनी या शिबिराची सांगता झाली.

**– मरियम ढवळे**

# डीवायएफआय-एसएफआयचे ठाणे जिल्हा अभ्यास शिबिर

ठाणे जिल्ह्याचे विद्यार्थी-युवा शिबिर गेल्या महिन्यात दोन दिवस कॉ. गोदावरी शामराव परुळेकर भवन, तलासरी येथे यशस्वीरीत्या पार पडले. या शिबिरात एसएफआय व डीवायएफआयचे ८०हून अधिक कार्यकर्ते विविध तालुक्यांतून हजर होते. किसान सभेचे राज्य उपाध्यक्ष आणि माजी खासदार व माजी आमदार लहानू कोम यांनी शिबिराचे उद्घाटन केले.

शिबिराच्या पहिल्या दिवशी डीवायएफआयचे संस्थापक राज्य सचिव महेंद्र सिंह यांनी 'सद्य राजकीय आव्हाने', डीवायएफआयचे माजी राज्य सचिव शैलेंद्र कांबळे यांनी 'युवा-विद्यार्थी आघाड्यांची संघटना बांधणी' आणि एसएफआय व डीवायएफआयचे माजी अखिल भारतीय उपाध्यक्ष डॉ. अशोक ढवळे यांनी 'विद्यार्थी-युवा संघटनेचा कार्यकर्ता कसा असावा?' हे तीन विषय घेतले.

दुसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात डीवायएफआय व एसएफआयचे ठाणे जिल्ह्यातील नेते नरेश शिंगडे, रामदास सुतार, सुनिल धानवा, वनशा दुमाडा आणि विपुल धोडी यांनी शिक्षण व रोजगाराच्या ज्वलंत स्थानिक प्रश्नांविषयी मांडणी करून त्यावर येत्या काळात संघर्ष तीव्र करण्याची हाक दिली.

यानंतर डीवायएफआयच्या राज्य सचिव प्रीति शेखर आणि एसएफआयचे राज्य सचिव दत्ता चव्हाण यांनी दोन्ही संघटनांची ध्येये, धोरणे, उद्दिष्टे व कार्यपद्धती याविषयी मार्गदर्शन केले.

एसएफआयच्या माजी अखिल भारतीय उपाध्यक्षा मरियम ढवळे यांनी ठाणे जिल्ह्यात या दोन्ही तरुणांच्या संघटना वाढविण्यासाठी काय केले पाहिजे याची मांडणी केली.

सीटूच्या वतीने डीवायएफआयचे माजी जिल्हा अध्यक्ष लाडक खरपडे आणि किसान सभेच्या वतीने डीवायएफआयचे संस्थापक जिल्हा अध्यक्ष बारक्या मांगात यांनी या शिबिराला शुभेच्छा दिल्या.

किसान सभेचे ज्येष्ठ नेते एल. बी. धनगर यांच्या मोलाच्या मार्गदर्शनानंतर किसान सभेचे राज्य उपाध्यक्ष आमदार राजाराम ओझरे यांच्या भाषणाने या शिबिराचा समारोप झाला.

**– नरेश शिंगडे**

# ठाणे जिल्हा विभाजनाविषयी पक्षाचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

ठाणे जिल्ह्याच्या विभाजनाची घोषणा राज्य सरकारने बऱ्याच दिरंगाईनंतर केली. राज्य सरकारच्या या घोषणेबाबत आमची भूमिका पुढे देत आहोत. या निर्णयाची अंमलबजावणी करताना तिचा गांभीर्याने विचार व्हावा ही मागणी आम्ही करत आहोत.

**१. ठाणे जिल्ह्याच्या त्रिभाजनाची गरज :-** १ कोटी १० लाख लोकसंख्येचा ठाणे जिल्हा हा लोकसंख्येनुसार देशातील सर्वात मोठा जिल्हा आहे. आता जाहीर केलेल्या विभाजनानुसार, नवीन प्रस्तावित पालघर जिल्ह्यात ३० लाख लोकसंख्या आणि नवीन प्रस्तावित ठाणे जिल्ह्यात ८० लाख लोकसंख्या असणार आहे. म्हणजे नवीन ठाणे जिल्हा तरीही प्रचंड लोकसंख्या असणारा जिल्हा राहणार आहे.

ठाणे जिल्ह्याच्या विभाजनाऐवजी त्याचे त्रिभाजन करावे ही मागणी आम्ही पूर्वीपासून करत आहोत. नागरी, सागरी आणि डोंगरी असे हे तीन जिल्हे असावेत असा आमचा शास्त्रीय दृष्टीकोनातून प्रस्ताव आहे.

नागरी जिल्ह्यात ठाणे-डोंबिवली-कल्याण-बदलापूर-शहापूर-मुरबाड-कसारा-बेलापूर-घोडबंदरपर्यंतचा भाग असावा; सागरी जिल्ह्यात मीरा रोड-भाईंदर-वसई-नालासोपारा-विरार-पालघर-बोईसर-डहाणू-बोर्डीपर्यंत पश्चिम रेल्वेच्या मुख्यत: पश्चिमेकडील बंदरपट्टीचा शहरी भाग असावा; आणि डोंगरी जिल्ह्यात तलासरी-डहाणू-पालघर-जव्हार-मोखाडा-विक्रमगड-वाडा या तालुक्यांतील पश्चिम रेल्वेच्या मुख्यत: पूर्वेकडील जंगलपट्टीचा ग्रामीण भाग असावा, जो मुख्यत: आदिवासीबहुल लोकवस्तीचा आहे.

नागरी जिल्ह्याचे केंद्र ठाणे असावे, सागरी जिल्ह्याचे केंद्र पालघर असावे आणि डोंगरी जिल्ह्याचे केंद्र जव्हार असावे अशी आमची सूचना आहे. असे त्रिभाजन झाल्यास ठाणे जिल्ह्यातील जनतेला खरोखर न्याय मिळेल असे आमचे मत आहे.

**२. ठाणे जिल्ह्याचे विभाजनच करावयाचे असल्यास:-** राज्य शासनाने जाहीर केल्याप्रमाणे ठाणे जिल्ह्याचे विभाजनच करायचे असे ठरल्यास, नवीन जिल्ह्याचे केंद्र पालघर नसावे असे आमचे स्पष्ट मत आहे. नवीन जिल्ह्याचे केंद्र डहाणू तालुक्यात चारोटी-कासाजवळ असलेले सुर्यानगर केले तर ते सर्वांसाठी अगदी मध्यवर्ती आहे. या ठिकाणी सुर्या धरण बांधले जात असतानाच्या काही पायाभूत सुविधाही पूर्वीच बांधलेल्या आहेत. सुर्यानगर हे नवीन जिल्ह्याचे केंद्र करणे अगदीच शक्य नसल्यास जव्हार हे नवीन जिल्ह्याचे केंद्र असावे असे आमचे मत आहे. जव्हारला गेली अनेक वर्षे अपर जिल्हाधिकारी कार्यालय कार्यरत आहेच. त्यात वाढ व सुधारणा करून डोंगरी भागातील आदिवासी व बिगर आदिवासी जनतेसाठी ते सोयीचे ठरेल असे आमचे मत आहे.

आमच्या वरील सूचनांचा विचार करून राज्य सरकारने निर्णय घ्यावा ही विनंती.

**आमदार राजाराम ओझरे**
**ठाणे जिल्हा सचिव**
**मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष**

# कॉ. के. श्रीधरन यांना अखेरचा लाल सलाम!



पश्चिम उपनगर तालुक्यातील ऑटो विंडो या पक्ष शाखेचे ज्येष्ठ पक्ष सभासद कॉ. के. श्रीधरन यांचे दि. २८ जून २०१४ रोजी कॅन्सरने दु:खद निधन झाले. ते ५७ वर्षांचे होते व गेल्या एक वर्षापासून कॅन्सरशी झुंज देत होते. ऑटो विंडो उद्योगसमूहाचे कामगार व कर्मचारी मागील ३४ वर्षांपासून सीटू अंधेरी सेंटरच्या इंजिनिअरिंग वर्कर्स युनियनचे सभासद आहेत. मितभाषी व अतिशय शांत स्वभावाचे कॉ. श्रीधरन गेली २८ वर्षे ऑटो विंडो समूहाचे कामगार होते. तेव्हापासून ते सीटू युनियनचे व गेली १७ वर्षे ते मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते. ते पक्ष व युनियनच्या कार्यक्रमात नेहमी उत्साहाने भागीदारी करीत व दिलेली जबाबदारी उत्तमरित्या पार पाडीत. त्यांच्या निधनाने पक्ष व सीटूने एक समर्पित, निष्ठावंत, अनुभवी कार्यकर्ता गमावला आहे.

त्यांच्या निधनाने सीटू अंधेरी सेंटर व प. उपनगर तालुका पक्षाचे मोठे नुकसान झाले आहे. त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी मीरा व मुलगे सुमित व सुरज आहेत.

माकपचे मुंबई जिल्हा सेक्रेटरी महेंद्र सिंह, राज्य कमिटी सदस्य व पश्चिम उपनगर तालुका सेक्रेटरी शैलेंद्र कांबळे, मुंबई कमिटी सदस्य व्ही. शशीकुमार, पश्चिम उपनगर तालुका कमिटी सदस्य कमल रावत, शिवाजी नाटेकर, ऑटो विंडो व साकी नाका पक्ष शाखांचे सर्व पक्ष सभासद व ऑटो विंडो उद्योग समूहाचे कामगार-कर्मचारी यांनी त्यांचे अंतिम दर्शन घेतले. त्यांच्या अंत्ययात्रेत साकी नाका परिसरातील पक्षाचे अनुयायी व सहानुभूतीदार मोठ्या संख्येने सामील झाले होते. सागवा येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करण्यात आले.

माकपची महाराष्ट्र राज्य कमिटी, मुंबई जिल्हा कमिटी, पश्चिम उपनगर तालुका कमिटी, ऑटो विंडो पक्ष शाखा व ऑटो विंडो उद्योग समूहाचे कामगार-कर्मचारी व 'जीवनमार्ग' कॉ. के. श्रीधरन यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत असून त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहेत.

**कॉ.के.श्रीधरन लाल सलाम! कॉ.के.श्रीधरन अमर रहे!**

## मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या पॉलिटब्यूरोची निवेदने

# रेल्वे अंदाजपत्रक : जनतेवरच्या ओझ्यात आणखी वाढ!

भाजपाच्या नेतृत्वाखालील रालोआ सरकारचे पहिले रेल्वे अंदाजपत्रक म्हणजे केवळ रंगरंगोटीचा प्रकार आहे. प्रचंड कलकलाट, सूर मात्र गायब! कोणत्याही अंदाजपत्रकीय आकडेवारीचा आधार नसलेल्या बुलेट ट्रेन आणि व्यापारी मालवाहतूकीच्या मार्गिकेबद्दल लावलेला कर्कश स्वर आणि सगळा भर विदेशी थेट भांडवलाला (एफडीआय) आकर्षित करण्यावर तर विस्तार आणि आधुनिकीकरणासाठी खासगी-सार्वजनिक भागीदारीच्या (पीपीपी) लबाड मार्गाचा वापर.

रेल्वेची गरज ज्या सर्वसामान्य जनतेला सर्वात जास्त आहे आणि जी सर्वसामान्य जनता रेल्वेचाच वापर सर्वात जास्त करते त्या सर्वसामान्य जनतेवरचे दरवाढीचे ओझेच या अंदाजपत्रकाने वाढवले आहे. अंदाजपत्रकाच्या पूर्वीच वाढवलेल्या रेल्वे भाड्यातून ८००० कोटी रुपयांचा महसुल रेल्वेला मिळणार तर आहेच पण त्याशिवाय या अंदाजपत्रकाने भविष्यातील प्रवासी वाहतुकीचे दर इंधनाच्या किंमतीशी जोडून टाकलेले आहेत. याचा अर्थ, इंधनात होणाऱ्या प्रत्येक दरवाढीबरोबर आपसुकपणेच प्रवासी वाहतुकीचे दर वाढत जाणार आहेत. त्यामुळे दरवाढीची तलवार सतत जनतेच्या डोक्यावर टांगती राहणार आहे.

तसेच, एफडीआय आणि पीपीपी मार्गांचा वापर विमानतळे आणि बंदरे या पायाभूत सोयींसाठी करण्यात आलेला आहे. त्याचा अनुभव असा आहे की त्यामुळे ग्राहकाला त्याची प्रचंड किंमत चुकवावी लागते. आणि हेच आता रेल्वेच्या बाबतीत घडणार आहे. अंदाजपत्रकातील पीपीपीची आकडेवारीही अवास्तव आहे कारण अंदाजपत्रकातच माहिती दिली आहे. गेल्या वर्षी पीपीपीचे लक्ष्य ६००० कोटी रुपयांचे होते पण ते प्रत्यक्षात आलेले नाही. हे अंदाजपत्रक म्हणजे भारतीय रेल्वेच्या खासगीकरणाचा आराखडाच आहे आणि या खासगी क्षेत्राच्या व विदेशी थेट भांडवलाच्या प्रचंड नफ्याच्या हव्यासाच्या आगीत भारतीय जनता मात्र होरपळून जाणार आहे.

परिणामी, सर्वसामान्य भारतीय माणसाला सेवा पुरविणे आणि मागास भागाला संपर्कात आणणे ह्या भारतीय रेल्वेच्या सामाजिक जबाबदारीला आता अलविदाच केले गेले आहे.

भारतीय रेल्वेची तब्येत सुदृढ करण्याच्या प्रश्नाबाबत अंदाजपत्रकात सांगितले गेले आहे, रेल्वे जे १०० रुपये कमावते त्यातून ९५ रुपये खर्च करते. म्हणजे ज्याला ऑपरेटींग रेशिओ म्हटले जाते तो ९५टक्के आहे. आधीचा हा ऑपरेटींग रेशिओ ९० टक्क्यांच्या आसपास होता तो आता २.७ टक्क्यांनी खाली आला आहे. त्या शिवाय रेल्वेच्या अंतर्गत स्त्रोतातून उत्पन्न मिळविण्याचे जे लक्ष्य होते त्यापेक्षा २००० कोटी रुपये कमी जमा झालेले आहेत. तरीही रेल्वे मंत्र्यानी जाहीर केले आहे बाजारातून कमीतकमी कर्ज घेतले जाईल.

गेल्या दशकात जे ९९ नवीन प्रकल्प मंजूर करण्यात आले त्यापैकी फक्त एक प्रकल्प पुरा झालेला आहे हे जरी रेल्वे मंत्र्यानी नोंदवले असले तरी भारतीय रेल्वेची भारतीय जनतेच्या आणि देशाच्या प्रति असलेली सामाजिक जबाबदारी आणि महत्त्वाची भूमिका निभावण्यासाठी जे अनेक नवीन महत्त्वाचे प्रकल्प आखले गेले आहेत त्यांच्या आराखड्याची माहिती देण्यात मात्र ते अपयशी ठरलेले आहेत. भारतीय रेल्वेच्या भविष्यातील विस्ताराला खीळ बसणार हे मात्र स्पष्ट आहे.

रेल्वेच्या वाहतूक सुरक्षेसंबंधी बरेच बोलले गेले मात्र ठोस काहीच सुचविण्यात आलेले नाही. त्याचप्रमाणे प्रामुख्याने वाहतूक सुरक्षा राखण्याशी संबंधित जवळ जवळ तीन लाख जागा रिकाम्या आहेत. त्या जागा भरण्यासंदर्भात कोणतेही संकेत दिले गेलेले नाहीत.

आपल्या अर्थव्यवस्थेसाठी आणि जनतेसाठी सुस्थितीतील रेल्वे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे तिची परिस्थिती सुधारणे गरजेचे आहे. पण हे सरकार रेल्वेची परिस्थिती सुधारण्याची आपली जबाबदारी पार पाडण्याऐवजी रेल्वेत विदेशी थेट भांडवलाला आकर्षित करण्यावर आणि मोठ्या प्रमाणावर खासगीकरण करण्यावर संपूर्ण भर देत आहे. थोडक्यात, देशातील जनतेवरील ओझे वाढणे आणि रेल्वे वाहतुकीच्या सुरक्षेच्या निकषांची पातळी आणखी खाली येणे हेच या अंदाजपत्रकाचे थेट परिणाम असणार आहेत.

*७ जुलै २०१४*

# मनरेगा मोडीत काढण्याची चाल!

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा पॉलिटब्यूरो महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा मोडीत काढण्याच्या किंवा कमकुवत करण्याच्या सरकारच्या कोणत्याही चालीचा तीव्र विरोध करीत आहे. राजस्थानच्या मुख्यमंत्र्यांनी कायद्याने जी रोजगाराची हमी दिलेली आहे ती रद्द करण्यात यावी आणि हा कायदा योजनेत रूपांतरित करावा असा प्रस्ताव ठेवला आहे. रोजगार हमीचा कायदेशीर हक्क देणारा मनरेगा हा एकमेव कायदा आपल्याकडे आहे. आपल्या निवडणूक मोहिमेत ज्या पक्षाने रोजगारवाढीचे वचन दिले होते तोच पक्ष आता हा रोजगार मिळवून देणारा एकमेव कायदा रद्द करण्याचे सुचवित आहे. संपुआ सरकारच्या अखेरच्या काळातही मनरेगाला वित्तीय काळजीने घेरले होते व त्यापायी मनरेगाच्या निधीत बरीच कपात करण्यात आली होती.

कमीतकमी शंभर दिवसांची हमी आणि पगार चुकते करणे, उशीरा मिळणाऱ्या पगाराबाबतची नुकसानभरपाई , बेरोजगार भत्ता तसेच थकबाकी देण्यासाठी निधीची उपलब्धता या सगळ्या उपायांच्या अंमलबजावणीच्या खात्रीसह अपेक्षित लाभधारकांच्या हक्कांचे संरक्षण करीत हा कायदा जास्तच प्रभावी करण्याची मागणी पॉलिटब्यूरो करीत आहे.

*४ जुलै २०१४*